जागतिक महिला दिन विशेषांक २०२५

दैनिक **समर्थ राजयोग**

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बीड(महाराष्ट्र) | दैनिक मराठी | वर्ष ५ वे । अंक-१८२ | शनिवार,दि.०८ मार्च २०२५ | ९८ २२ ६२ ८५ २१ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | । किंमत ३ रुपये | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year 5 Th Issue-182 | Date 8 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# आज जागतिक महिला दिन का साजरा केला जातो..?

जगतजननी, आदिशक्ती, बलशाली असलेल्या माझ्या माता,कन्या, भगिनीस महिलादिनी प्रणाम...

स्त्री म्हणजे अडथळ्यांवर मात,
स्त्री म्हणजे क्षणांची साथ,
स्त्री म्हणजे मायेचा हात,
स्त्री म्हणजे कष्टरुपी तेवणारी वात

संपुर्ण जगाच्या लोकसंख्येपैकी महिलांच प्रमाण जवळपास निम्म आहे.महिला कोणत्याही बाबतीत मागे नाहीत.त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.

प्रत्येक ठिकाणी महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. समाजाच्या प्रगतीत पुरुषां इतकाच महिलांचाही वाटा आहे. पण तरीही अनेक ठिकाणी महिलांना पुरुषांइतकीच संधी आणि सन्मान मिळत नाही.आजही त्यांना समानतेच्या हक्कासाठी अनेक ठिकाणी झगडावं लागल, लढावं लागत.

पहिला जागतिक महिला दिवस १९११ साली ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी आणि स्वित्झरलँडमध्ये साजरा केला गेला होता. त्याची शताब्दी २०११ साली साजरी झाली.

दि. ८ मार्चला संपूर्ण जगभरात ' महिला दिन ' साजरा केला जातो. महिलांच्या सन्मानार्थ जगभरात मोठ्या उत्साहात जागतिक महिला दिन साजरा केला जातो.

महिला दिवसाला संयुक्त राष्ट्रांची अधिकृत मान्यता १९७५ साली मिळाली तर प्रत्येक वर्षांची खास थीम स्वीकारायला सुरुवात झाली १९९६ साली पहिलं घोषवाक्य होतं. 'भूतकाळ साजरा करताना भविष्याची धोरणं ठरवण'

महिला दिनाची सुरुवात कधी झाली – पहिल्या महायुद्धापूर्वी महिलांना घराबाहेर पडून काम करण्याची परवानगी नव्हती.या काळात पुरुष सैन्यामध्ये असल्याने विविध क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी महिला उमेदवारांना संधी दिली जाऊ लागली. कामाच्या ठिकाणी महिलांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जात होते. कामाची वेळही अधिक असल्याचा महिला कर्मचारी आरोप करत होत्या. अमेरिकेसह युरोपातील अनेक देशांमध्ये ही स्थिती होती.


कामाच्या ठिकाणी असलेल्या पितृसत्ताक विचारसरणी विरोधात १९०८ मध्ये अमेरिकेत कामगार चळवळ झाली. सुमारे १५,००० महिलांनी न्यूयॉर्कच्या मोर्चा काढत हक्कांसाठी आवाज उठवला. कामाचे तास कमी करुन वेतन वाढवले जावे , अशी मागणी नोकरदार महिलांनी केली . त्यांनी मतदान करण्याच्या अधिकाराची मागणी केली. यानंतर १९०९ मध्ये या चळवळीच्या एका वर्षांनंतर अमेरिकेच्या सोशलिस्ट पार्टीने महिला दिन साजरा करण्याची घोषणा केली.८ मार्च रोजी काढण्यात आलेल्या मोर्चामुळे अमेरिकेत हा दिवस महिला दिन साजरा केला गेला. संयुक्त राष्ट्र संघाद्वारे १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते. तेव्हा ८ मार्च १९७५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला गेला. १९७७ मध्ये याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आली.

महिला दिन का साजरा केला जातो – महिलांना समान संधी मिळावी, महिलांना त्यांच्या अधिकारांची जाणीव व्हावी तसेच समाजामध्ये महिलांच्या हक्कांबाबत जागरुकता वाढावी.यासाठी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. सध्या बऱ्याचशा महिला या प्रगती करत असल्या तरीही या वर्गातील काही महिलांना समान सन्मान आणि अधिकार मिळालेले नाहीत. यांच्या हक्कांची जाणीव समाजाला करवून देण्यासाठी दरवर्षी ८ मार्च रोजी संयुक्त राष्ट्र संघाद्वारे हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

**आदिशक्ती तू, प्रभूची भक्ती तू ,**
**झाशीची राणू तू**
**जगत जननी तू**
**मावळ्यांचा भवानी तू**
**प्रयत्नांनाा लाभलेली उन्नती तू**
**आजच्या युगाची प्रगती तू**
**जागतिक महिला दिनाच्या सर्व महिलांना हार्दिक शुभेच्छा..!**



:::शब्दांकन:::
**शेख आयेशा, का. संपादक**




# पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राचे 'राज्यस्तरीय स्त्रीरत्न' पुरस्कार जाहीर

**प्राजक्ता सुरेश धस, श्रीमती निर्मला झुंबरलाल खटोड, चंपावती काकी कृष्णा पानसंबळ, डॉ. मीरा प्रशांत ढाकणे (नागरे), श्रीमती अनिता गौतम वाघमारे, रूपाली जयंत देशपांडे, जयश्री विलास विधाते, रुक्मिणी नवनाथ शिराळे, प्रतिभा शिनगारे (शिंदे), मेधा गोसावी (कुलकर्णी),अरुणा हांप्रस, दैवशाला सिरसट(भालेराव), श्रीमती द्वारका कांबळे, मसरत सुलताना बेगम, उम्मेहानी शेख, झीनत शेख यंदाच्या पुरस्काराचे मानकरी ठरल्या..!**

**बीड राजयोग । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्कार – २०२५ चे वितरण मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा संपादक वैभव स्वामी आणि कार्यक्रमाच्या आयोजक शेख आयेशा अध्यक्ष आश्रय सेवा केंद्र तथा संपादक लोकजगत यांनी केले आहे.**




बीड येथील हॉटेल नीलकमलच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रशस्त हॉलमध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिनांक ८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय स्त्रीरत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे. या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब यांची विशेष उपस्थिती राहणार असून बीड विधान सभेचे आमदार संदीप भैया क्षीरसागर, आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे राज्यभर गाजत असलेले आमदार सुरेश धस यांच्या सुविध्य पत्नी सौ प्राजक्ता सुरेश धस, माजी आमदार अँड उषाताई दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक थोरात, उपविभागीय जिल्हाधिकारी सौ कविता जाधव, प्रकल्प संचालक डीआरडीए जिल्हा परिषदच्या संगीतादेवी पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे ,प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख आणि बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान या मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार मूर्तींना गौरवण्यात येणार आहे.सत्कारमूर्तींना शाल,एक झाड, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आणि फेटा बांधून सन्मानित करण्यात येणार आहे.या दैदिप्यमान सोहळ्यास सत्कारमूर्तींच्या कुटुंबीयांनी, त्यांच्या आप्तेष्ट, मित्र परिवार, नातेवाईक तसेच या कार्यक्रमास तमाम पत्रकार बांधवांनी त्यांच्या कुटुंबियांनी पत्रकार प्रेमी नागरिकांनी उस्फूर्तपणे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव विवेक स्वामी तसेच आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष तथा लोकजगतच्या संपादक शेख आयेशा यांनी केले आहे.






## जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभर 'विशेष ग्रामसभा' - महिला व बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे

मुंबई । प्रतिनिधी

महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबविणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या विशेष ग्रामसभेमध्ये स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि नागरिकांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे. महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि मुलभूत हक्कांसाठी लढा देण्याची महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आजच्या काळातही महिलांसाठी न्याय आणि सुरक्षा देणे तसेच प्रत्येक गाव आणि खेड्यापर्यंत महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून बालविवाह, जाचक विधवा प्रथा, अन्यायकारक अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच मुलींच्या जन्मदर वाढीसाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे.










# शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर जमिनीस प्रशासकीय मान्यता द्यावी

## वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या सूचना

बीड (प्रतिनिधी)

शेतकरी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात गायरान जमिनीवर जाळा लागवडीसाठी हजार हेक्टर वर आहे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशा सूचना स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी एका बैठकीत दिल्या.आपल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात या बैठकीत बीड तालुक्यातील पिंपळवाडी मधील मयत शेतकरी दादाराव बहिरवाळ यांच्या वारसांना त्यांनी यावेळी भेट दिली.सर्व शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कंपनी व प्रतिनिधीचे नाव आणि मोबाईल प्रत्येक ग्रामपंचायतीत फ्लेक्स द्वारे लावावा अशी सूचना त्यांनी या बैठकीत केली.

विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची शासनाने नियुक्ती केलेली आहे. या अनुषंगाने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मिशनसंबंधी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधिकारी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीत अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले.उपजिल्हाधिकारी रोहयो, बीड यांनी गायरान जमिनीवर चारा लागवड करणेकामी १००० हेक्टरवर लागवड करण्यासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रं. ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यासाठी जिल्हयातील सर्व १०६५ ग्रामपंचायतींमध्ये प्रतिनिधींची नावे / सूचना डिजिटल फ्लेक्स स्वरुपात लावावेत.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी शेतीच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करण्यासाठी मौ. खामगाव ता. गेवराई व डिघोळअंबा ता. अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी १० कॅम्प आयोजित करुन ५०० मास्टर ट्रेनर्स तयार करावेत.प्रेरणा प्रकल्पांतर्गत आरोग्य कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. व आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे कुटुंबियांना भेटी देण्यात याव्यात. व त्यांचे मानसिक स्वास्थ्याची काळजी घेणेबाबत निर्देश दिले.




सर्व कृषी उत्पन्न बाजार समितींच्या व सर्व ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डवर शेतीमालाचा भावफलक लावण्यात यावा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी शेतीमालाच्या आधारभूत किंमती बाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.सहआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभाग, बीड यांनी त्यांच्या विभागाच्या योजना तरुणाईला माहिती नसल्याने पुरेशी प्रसिध्दीद्वारे माहिती करुन द्याव्यात. सदर योजनेच्या माध्यमातून लाभ मिळेल असा प्रयत्न करण्यात यावा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद बीड यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वारसांना स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तके / वाचनालय उपलब्ध करुन द्यावे. मैदानी खेळांसाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी वापरुन जिल्हयात किमान २५ मैदाने तयार करावीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्याकडे २२८ अर्ज प्राप्त झालेले असून, त्यामध्ये बँकेने ३५टक्के सबसिडी दिलेली आहे. तसेच ९९ अर्ज मंजूर केलेले आहेत. उर्वरीत प्रलंबित अर्जावर विनाविलंब कार्यवाही करावी.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत कलम १८ अन्वये सावकारकीमध्ये सावकारांनी बळकावलेली (रजीस्ट्री करुन घेतलेली) १८ प्रकरणात २३.७७ हे. आर. जमिन शेतक-यांना परत केली असल्याचे सांगितले. त्याबद्दल त्यांचे अध्यक्ष यांनी अभिनंदन केले. व उर्वरीत प्रकरणांमध्ये ३ महिन्यात निर्णय घेण्याचे सूचित केले. विभागीय वन अधिकारी यांनी वन्य प्राण्यांपासून शेतक-यांचे नुकसानीमुळे मोबदला मिळण्यासाठी ज्या क्षेत्रात वन्यजीव जास्त आहेत त्या ठिकाणी वन विभागाच्या योजनेबाबत जनजागृती करावी. आष्टी, पाटोदा, धारुर व वडवणी या तालुक्यांमध्ये जास्त वनक्षेत्र असून, तेथील व जिल्हयातील नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यात यावा. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत शेतक-यांना एप्रिल २०२३ पासून १५० रु. प्रमाणे एकूण ४९१२४ शिधापत्रिकाधारकांना २६ कोटी ९२ लक्ष रुपयांचे वाटप केलेले असल्याचे सांगितले. विस्तार अधिकारी कृषी जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयामार्फत शेतक-यांसंबंधी आदिवासी विभागाच्या योजनेत २ शेतक-यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. रेशीम विकास अधिकारी, बीड यांनी मागील वर्षी १२१६ मे.टन उत्पादन तसेच यावर्षी ५७०० एकरवर लागवड केलेली असल्याचे सांगितले. यासंबंधाने अध्यक्ष यांनी दि.०७.०७.२०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिले. वरीलप्रमाणे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणेबाबत निर्देशही कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे यांनी दिले.

पक्षुच्या चा-यासंबधी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पीपीटीव्दारे माहिती सादर केली तर कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

## आज स्त्री होऊ या .....!!!

आज ८ मार्च जागतिक महिला दिनाला हे वाचून काहीसे आश्चर्य वाटेल पण हा मुद्दा नीट समजून घ्यावा। रजनिश म्हणतात करुणा, प्रेम, अहिंसा, सेवा हे स्त्रीत्वाचे गुणविशेष आहेत. आणि हिंसा ,कठोरता, हे सारे पुरुषी गुण आहेत. या दोन्ही प्रकारच्या गुणांचा स्त्री किंवा पुरुषांच्या शरीराशी काहीही संबंध नाही. हे गुण दोन्हीही प्रकारच्या व्यक्तीत असू शकतात. दोन्ही प्रकारचे गुण एकाच व्यक्तींत सुध्दा असू शकतात पण जे गुण जास्त प्रभावी असतील ती व्यक्ती त्या प्रकारची समजावी. म्हणजे एखाद्या स्त्रीमध्ये कठोरता असेल तर ती पुरुषप्रधान गुणांची आहे आणि एखादा पुरुष स्त्री गुण असलेला आहे तर त्या व्यक्तीला स्त्रीप्रधान गुणांचा मानावा. ( येथे परत एकदा सांगते की करुणा, प्रेम, अहिंसा, सेवा हे गुण म्हणजेच स्त्रीत्वाचा आविष्कार आणि हिंसा व कठोरता म्हणजेच पुरुषत्व हे लक्षात आले की हे का लिहिले आहे हे लवकरच कळेल )

इतके थेट स्पष्ट केल्यावर रजनिश बुद्धांचे उदाहरण देतात ते म्हणतात की बुद्धांचा प्रवास हा पुरुष मूल्यांकडून स्त्री मूल्यांकडे होतो आहे. राजा अशोकाचा प्रवास हा त्याच प्रकारचा आहे. त्यामुळे स्त्री मूल्ये ही मानवतावादी मूल्ये आहेत आणि तीच आध्यात्मिक मूल्ये आहेत. आपल्यातील मनुष्यत्वाला ती उन्नत करणारी मूल्ये आहेत. ते उदाहरण देतात की राम, कृष्ण, महावीर ,बुद्ध यांची चित्र पुरुष असूनही दाढी मिशा नसलेली काढली जातात किंबहुना स्त्रीप्रधान सुंदरतेने काढली जातात याचे कारण त्या व्यक्तीचा प्रवास हा स्त्री प्रधानतेकडे झालेला आहे हे दाखविले जाते. म्हणून हिंसा करणारा योद्धा हा दाढी मिशा असलेला आणि संत हा स्त्री चेहर्यातच दाखविण्यामागे ही मूल्यांची वाटणी आहे.

महाराष्ट्रात ' ज्ञानेश्वर माऊली ' हा शब्दप्रयोग कुणाला खटकत नाही आणि एका पुरुषाला माऊली का म्हटले जाते याचे उत्तर मिळते आणि ज्ञानेश्वरांचे चित्र हे मिशा दाढी नसलेले व सुंदर का दाखविले जाते याचे उत्तर मिळेल. साने गुरुजींना महाराष्ट्राची माऊली म्हटले जाते ते यामुळेच. साने गुरुजी यांचे व्यक्तिमत्व रजनिश म्हणतात त्याप्रकारचे आहे व आंदोलनात ते पुरूष गुण ही व्यक्त करीत

अमृता प्रीतम आणि इमरोज नात्यात इमरोज ची जास्त चर्चा होते याचे कारण इमरोज याने ही स्त्री प्रधान गुण खूप उत्कृटतेने आत्मसात केले आहेत आणि स्वामित्व भावना या पुरुषी गुणाच्या वर उठून स्त्रीप्रधान समर्पणाची आणि प्रेमाची चरणसीमा गाठून दाखवली आहे त्यामुळे आपण सारे कोमल होऊ या। स्त्री गुण आत्मसात करू या

एवढेच जर या महाराष्ट्राच्या लोकांच्या लक्षात आले तर आज सुरू असलेल्या कुटुंबातील व समाजातील अनेक समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत होईल म्हणून आपण महाराष्ट्र राज्यातील सर्वचजण आज संकल्प करुया आणि आपल्या समस्या आपणच सोडवुया

हिच आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करते



**सौ. आशाताई बाजीराव ढाकणे**
सचिव
श्री तुळजाभवानी महिला
बहुउद्देशीय
सेवाभावी संस्था जोला पो देवगाव
ता केज जि बीड

# महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर ना. पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात मांडल्या मनातील भावना

## स्त्री शक्तीला ताकद देण्याचे काम शासन करतेय

मुलींना कर्करोगापासून वाचविण्यासाठी शासनाने लस देण्याचे प्रयोजन करावे

राजकारणात महिलांचा टक्का वाढायला हवा

मुंबई (प्रतिनिधी)

शासनाच्या योजना ह्या स्त्रियांच्या उन्नतीसाठी असायला हव्यात. स्त्री शक्तीला ताकद देण्याचे काम शासनाने केले असल्याचे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताईद मुंडे यांनी केले. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळात आयोजित विशेष चर्चेत सहभाग घेताना मंत्री पंकजाताई मुंडे यांनी महिला शक्ती विषयी गौरवोद्गार काढून स्त्रीच्या महानतेची, तिच्या सहनशीलतेची गाथाच आपल्या भाषणातून व्यक्त केली.

मुली, महिलांमध्ये होणाऱ्या कर्करोगविषयी चिंता व्यक्त करून श्रीमती मुंडे म्हणाल्या की, मुलींना कर्करोगापासून वाचविण्यासाठी त्यांना शासनामार्फत लस देण्याचे प्रयोजन केले तर त्यांना कर्करोगाच्या धोक्यापासून वाचवू शकू. महिलांनी स्वतः कमवायला पाहिजे, यासाठी त्यांना शिक्षण गरजेचे आहे. शासनाच्या योजना सशक्त मातांसाठी आहे, तथापि, सशक्त माता बरोबर त्या सशक्त मनुष्य व्हायला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

स्त्रियांच्या ताकदीची महती सांगून मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, आम्ही स्त्रिया या खूप कठीण परिस्थितीला सामोरे जायला तयार झालेल्या आहोत.स्त्रिया कठीण परिस्थितीला सक्षमपणे तोंड देतात.त्या स्पष्ट बोलतात, राजकारणात डावपेच कमी खेळतातस्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तर ती आत्मनिर्भर राहू शकते. शिक्षण आणि पोषण हे स्त्री सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे घटक आहेत. महिलांनी कधीही घेतलेले कर्ज बुडवलेले नाही; त्यामुळे आर्थिक व्यवहारात त्यांचा सहभाग वाढवावा. महिला बचतगटांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक योगदान दिले आहे.त्यांना कमी व्याजदरात कर्ज दिल्यास त्या उत्तम व्यवस्थापन करू शकतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महिला आरक्षणा व महिला सुरक्षा विषयावर मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण मिळाले आहे. आता राजकीय क्षेत्रात अधिकाधिक महिलांचा सहभाग वाढायला हवा. महिलांना केवळ मदत मिळवणाऱ्या नव्हे, तर सक्षम नागरिक म्हणून उभे करणे गरजेचे असून त्यांचे मानसिक आणि सामाजिक सक्षमीकरण होणे आवश्यक. त्याच बरोबर महिलांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष दिले पाहिजे. महिलां विषयीच्या सायबर गुन्हे, अन्याय, शोषण यावर कठोर कारवाई आवश्यक आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा देण्याचा निर्णय

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतला त्याबद्दल त्यांचे आभार ही मंत्री महोदयांनी व्यक्त केल्या.

जलयुक्त शिवार ही स्त्रियांच्या डोक्यावरील घागर काढण्यासाठी झाला. त्यामुळे शासनाच्या योजनाचा जास्तीत जास्त लाभ महिलांना मिळावा, यासाठी मी ग्राम विकास मंत्री असताना प्रयत्न केले. मंत्री पदाच्या काळात अंगणवाडीच्या माध्यमातून महिलांना चांगल्या दर्जाचा पोषण आहार मिळावा यासाठी प्रयत्न केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

स्त्रियांचा सन्मान, त्यांची आर्थिक आणि सामाजिक सक्षमता, शिक्षण, पोषण, आरक्षण, आणि सुरक्षा हे सर्व महत्त्वाचे मुद्दे आहेत. समाजाच्या आणि शासनाच्या मदतीने महिला सक्षम होऊ शकतात, स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात आणि देशाच्या विकासात मोठे योगदान देऊ शकतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# यत्र नार्यस्तू पुज्यनते, रमनते तत्र देवता

पुस्तकात असे सांगितले आहे की, ज्या ठिकाणी नारीचा आदर केला जातो त्या ठिकाणी देवता वास करतात.पूर्वीच्या काळी समाजात स्त्रीला आदराचे स्थान होते. समाजात कुटुंबात स्त्रीला दर्जा प्राप्त होता . परंतु नंतरच्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला गौण स्थान प्राप्त झाले. तिला शिक्षणाचा अधिकार आणि स्वतंत्र्य उपभोगू दिले नाही. चूल आणि मुल हेच तिचे

जीवन कार्य आहे. गृहीत धरून तीस स्वातंत्र्य, शिक्षण आणि अधिकारापासून स्वातंत्र्यशिक्षण आणि अधिकारापासून कोसो दूर

ठेवण्यात आले.

आपल्या सर्वांना माहीत आहे की, आपल्या जीवनात स्त्रियांची एक भूमिका आहे. ती भूमिका आई, बहिण, पत्नी किंवा मैत्रीण अशी असते. आम्हाला प्रत्येक स्वरूपात स्त्रीचा पाठिंबा मिळतो. पण त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करणे हे फारच दुर्मिळ असते अशावेळी आंतरराष्ट्रीय महिला दिन आम्हाला आमचे जीवन समृद्ध परिपूर्ण करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्याची संधी देते. हा दिवस महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी, त्यांच्या कर्तुत्वाचा गौरव करण्यासाठी, त्यांच्या समान हक्कांना आणि समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो.

स्त्री म्हणजे जन्मदाती,
स्त्री म्हणजे संस्कृती,
स्त्री म्हणजे नाविन्याचा वसा,
स्त्री म्हणजे घराचे घरपण,
स्त्री म्हणजे महान कार्य

अशा या स्त्री शक्तीला मानाचा



मुजरा......

स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून मुलींना स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून स्वतंत्र स्वराज्य निर्माण करून देण्यासाठी केलेल्या संघर्षाचे दर्शन देणाऱ्या राजमाता जिजाऊ, मै मेरी झाशी कभी नही दूंगी असे ठमकावून इंग्रजांशी संघर्ष करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या सर्व स्त्रियांच्या कार्याला वंदन करते. आपल्या इतिहासात हिरकणी सारखी एक आई होऊन गेली जी स्वतःच्या बाळाच्या प्रेमापोटी रायगडाचा उभा करा उतरून आली. झाशीची राणी होऊन गेली जी बाळ पाठीवर बांधून लढली त्यावरून स्त्री एक आघात शक्तीचे रूप आहे का? हा प्रश्न समाजाला विचारायची वेळ आली आहे. त्रिपुरुष समतेचा संदेश सर्वप्रथम ज्ञानराज माऊलींनी दिली. माऊली म्हणतात स्त्री पुरुष नामभेद श्र

एकपण देवीची नांदे श्र

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर म्हणतात ारप ळी पीं लेाािीशी ारप लीी िहश ळी िंहश लोश्रिळ-ाशपीं. स्त्री ही पुरुषाची स्पर्धात नसून पूरक आहे.

भारताच्या पहिला महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, भारताच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेल्या महिला प्रतिभाताई पाटील, भारतीय पोलीस सेवेत अधिकारी पदी असलेल्या किरण बेदी, भारतरत्न किताबाच्या मानकरी गान सम्राज्ञ लता मंगेशकर एक स्त्री म्हणून अशा या स्त्रियांचा गौरव सांगताना मला खूप अभिमान वाटत आहे. सलाम या नारी शक्तीला..... प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असे म्हटले जाते, हे सिद्ध करणारी अनेक उदाहरणे समाजात आहेत. स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून स्त्री शिक्षणाचा वारसा हाती घेतलेल्या महात्मा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शिकून वारसा चालवला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण घेताना त्यांची परीक्षा फी भरण्यासाठी पत्नी रमाबाई यांनी कष्ट करून पैसे कमावले. अशी अनेक उदाहरण पुरुषांच्या यशामागे स्त्रियांचा वाटा दर्शवतात.

माता महान आहे. जपश सेव िंहशी ळी लशीींशी िंहरप १०० िशरलहशी. म्हणून समाजात मुली जन्माला आल्या पाहिजेत. मुलगा मुलगी समान माना. स्त्रीभ्रूण हत्या रोखा. समाजाचा सर्वांगीण विकास करा. कारण देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे. हाच जागतिक महिला दिनी तुम्हाला संदेश श्र

श्रीमती उषा श्रीधरराव मुंडे (केदार)
जि.प. प्रा.शाळा शाहूनगर, बीड.



# अन्वा टाकळी बाग पिंपळगाव प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

पैठण तहसील यांना धनगर बांधवाकडून निवेदन

पैठण (प्रतिनिधी)

भोकरदन तालुक्यातील अनवा येथील कैलास बोराडे टाकळी तालुका (लातूर )येथील माऊली उमाकांत सोट आणि बाग पिंपळगाव तालुका गेवराई जिल्हा बीड येथील ज्ञानेश्वर रामेश्वर महानोर या तरुणांना झालेल्या माणूस मारहाणी प्रकरणी दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी धनगर जमातीच्या वतीने करण्यात आली आहे याबाबतचे निवेदन दिनांक ४ मार्च २०२५ रोजी नायब तहसीलदार घुगे यांच्यामार्फत विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आले निवेदनात म्हटले आहे की अनवा येथील कैलास बोराडे यांना गाव गुंडांनी भयानक मारहाण करून लोखंडाची चटके दिले टाकळी येथील माऊली उमाकांत सोट यांना जातीवरून झालेल्या वादातून मारहाण करण्यात आली होती या मारहाणीत गंभीर जखमी झाल्यानंतर दोन महिन्याच्या कोमातून त्यांचे दुःखद निधन झाले तसेच बाग पिंपळगाव येथील ज्ञानेश्वर महानोर यांना नांदूर घाट येथे मारहाण करून दोन लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली या त्रासामुळे त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे ज्ञानेश्वर महानोर यांच्या कुटुंबीयांना वारंवार गेवराई पोलीस ठाण्यात धाव घेतली मात्र संबंधित अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे अद्याप एकही आरोपीला अटक झालेली नाही असेही निवेदनात नमूद आहे निवेदन देताना आप्पासाहेब भोंडे बापूसाहेब वीर राजूभाऊ पाचे मिटू नन्नवरे दामोदर गांगले योगेश पाचे दत्तू वाघ ज्ञानेश्वर पवार दीपक चोरमारे विशंभर भावले बंडू महाराज गाडे मोहनराव जानकर जिजाभाऊ मिसाळ जगदीश वीर सतीश गायकवाड बाबासाहेब भावले आदींची उपस्थिति होती

# शेतकऱ्यांचा राहिलेला ऊस तात्काळ तोडावा; अन्यथा तीव्र आंदोलन करणार-सुदाम शेवत्रे

जाफराबाद (प्रतिनिधी) तालुक्यातील ब्रह्मपुरी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली मागाणी हंगाम वर्ष २०२४-२५ मधील नोंद असलेला ऊस तात्काळ तोडूण नेण्यात यावा नसता नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी प्रादेशिक सह संचालक साखर सभाजी नगर यांच्या कडे एका निवेदन देऊन केली आहे.

या निवेदनात शेतकरी सुदाम विष्णु शेवत्रे व इतर सर्व शेतकरी रा. ब्रम्हपुरी, ता. जाफ्राबाद, जि. जालना. येथिल मौजे शिवार ब्रम्हपुरी मध्ये १० ते ११एक्कर आज रोजी ऊस उभा बसतांना बारामती ॲग्रो युनिट २ कन्नड, येथिल कारखाना दि.७/३/२०२५ ला गाळप हंगाम २४-२५ बंद करण्याचे पत्र काढल्यामुळे वरिल आम्हा सर्व शेतकऱ्यांवर उपामारीची पाळी येणार असून यातुन वरिल पैकी एखादया शेतक-याने अर्थकारण बिघडल्यामुळे कौटुंबीक समस्या पूर्ण न झाल्यामुळे, अशा अनेक समस्या पुर्ण न



झाल्यामुळे त्यांच्या डोक्यात आत्महात्येसारखा विचार आल्यास त्या विवारातून वरिल पैकी एखादया शेतक-याने आत्महात्या केल्यास घास बारामती ॲग्रो सुमित २ कन्नड र प्रदिशिक सह, संचालक (साखर) व साखर आयुक्त कार्यालय पुणे. यांच्यावर सदोश मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात यावे.

सोबत सदरिल प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन वरिल शेतकऱ्यांचे ऊस गाळपास नेण्याचे आदेश द्यावे नसता स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल याची सर्वस्वी जवाबदारी आपल्या कार्यालयाची राहील. असे या निवेदनात शेतकऱ्यांनी अर्ज करून मागणी केली आहे.

# पैठण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची निवेदना द्वारे मागणी

पैठण (प्रतिनिधी)

पैठण हे ऐतिहासिक,धार्मिक तसेच प्रेक्षणीय स्थळ आहे.पैठण शहरामध्ये लाखो भाविक दर्शनासाठी व पर्यटक प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी येत असतात.पैठण शहरामध्ये पर्यटकांची व भाविक-भक्तांची संख्या वाढत चाललेली आहे तसेच नाथ-षष्ठीमध्ये लाखोच्या संख्येने दिंड्या लाखो- भावीक , वारकरी मंडळी हे मोठ्या उत्साहात दर्शनासाठी येत असतात.परंतु नाथ षष्ठी मध्ये दर्शनासाठी व पर्यटन साठी येणाऱ्या लोकांच्या वस्तूंची/सामानाची चोरी व खिसे कापून चोरी करण्याचे प्रकार देखील जास्त प्रमाणात होत असतात त्यामुळे पैठण शहरातील नागरिकांना/महीलांना तसेच येणाऱ्या भाविकांना-वारकऱ्यांना नाहक मानसिक त्रासाला सामोरे जावुन आर्थिक नुकसान होते तसेच पैठण शहरामध्ये विविध असे ऐतिहासिक स्मारके, आहेत पैठण शहरातील विविध भागात चोरी/घरफोडी होण्याचे व गौण- खनिज चोरीचे तसेच नाथ सागर जलाशयाच्या पायथ्याशी व जलाशयामध्ये आत्महत्येचे / घातपाताचे प्रकार जास्त प्रमाणात वाढलेचे दिसून येत आहे.अशा गैरप्रकारामुळे आपल्या पैठण भूमीची नाहक बदनामी होते.



सद्यस्थितीत, देशामध्ये तसेच राज्यामध्ये शहरामध्ये बलात्कारासारखे गंभीर स्वरूपाचे कृत्य व गुन्हे घडत असल्याचे दिसत आहे त्यामुळे महिलांमध्ये व शैक्षणिक शिक्षण घेत असलेल्या मुलींमध्ये

असुरक्षितेची भावना निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे त्यामुळे महिलांच्या/मुलींच्या सुरक्षितेचा देखील प्रश्न खूप गांभीर्याचा झालेला आहे त्यामुळे या पैठणच्या पवित्र अशा पावण भूमीमध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडवू नये यासाठी पैठण शहरातील प्रेक्षणीय,धार्मिक स्थळांच्या ठिकाणी तसेच दर्शनी भागांवरती तसेच शाळा कॉलेजेस इतर सर्वत्र ठिकाणी सुरक्षेतेच्या दृष्टिकोनातून शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे त्याचप्रमाणे सुरक्षा कक्षांची निर्मिती करण्यात यावी व त्यासाठी संबंधीत पोलीस स्टेशनचे देखील मदत घ्यावी व गैर कायदेशीर कृत्य करणाऱ्या लोकांवरती कायदेशीर कारवाई करण्यासाठी यथायोग्य उपाययोजना संबंधित पोलीस स्टेशन पैठण यांच्या माध्यमातून करण्यात यावेत.यामुळे गैर कायदेशीर कृत्य करणाऱ्या लोकांवरती कायदेशीर कारवाई करण्यास व गुन्हेगारांना पकडण्यास शासनाला मदत होईल व पैठण भूमितील नागरिकांनमध्ये सुरक्षितेचे भावना निर्माण होऊन गुन्हेगारीला आळा बसेल

तसेच यापूर्वी देखील पैठण शहरांमध्ये सीसीटीव्ही

कॅमेरे बसविण्यात आले होते पण ते पूर्णतः बंद पडलेले आहेत.शासनाने सुरक्षेतेच्या माध्यमातून उपाय योजना करण्यासाठी योग्य तो निधी उपलब्ध करून दिलेला आहे तरी देखील पैठण शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले असल्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण जास्त वाढले आहे.परंतु असे असतांना देखील सीसीटीव्ही चालू करण्याबाबत

कोणत्याही प्रकारचे योग्य ते उपाय-योजना करण्यात आलेल्या नाहीत उलट शासनाचा निधी नाहक वाया खर्च गेल्याचे दिसून येत आहे

पैठण शहरातील नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी व भविष्यात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार होऊ नये /घडु नये हे टाळण्यासाठी व गुन्हेगारांना पकडण्यासाठी , गुन्हेगारीला आळा बसवण्यासाठी पैठण शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येऊन सुरक्षा कक्ष त्वरित उभारण्यात यावेत अशी अँड.सुभाष बाबुराव खडसन यांनी निवेदनाद्वारे नगरपरिषद यांना केली आहे



## रमजान ईद मुळे मार्च महिन्याचा पगार २५ मार्च पर्यंत करण्याचा प्रयत्न करू:- सुरेश केंद्रे

बीड (वर्ताहार) अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना बीड चे जिल्हा अध्यक्ष काझी मुशाहेद व कार्याध्यक्ष उस्मान खान यांनी ०६/०३/२०२५ रोजी मा.सुरेश केंद्रे साहेब मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची भेट घेऊन रमजान ईद चा सन असल्या मुळे मार्च चा पगार २२ मार्च पूर्वी करण्यात यावी असे निवेदन सादर केले.

मा. सुरेश केंद्रे साहेब यांनी अखिल महाराष्ट्र ऊर्दु शिक्षक संघटना बीड च्या पदअधिकारी यांना रमजान ची शुभेच्छा दिली व २५ मार्च पर्यंत पगार करण्याचे पर्यंत करू असे अशवासन दिले.



## महाराष्ट्र बँकेतील कर्मचाऱ्यांचे आपल्याच बँकेसमोर निदर्शने

बीड (प्रतिनिधी)

देशभरातील ५१ झोन अंतर्गत काम करणाऱ्या ३००० कर्मचारी सभासदांनी ६ मार्च रोजी बँकेचे कार्यालयीन कामकाज संपल्यानंतर देशभरात सभासदांनी बँकेसमोर निदर्शने केली. त्यात बीड मधील बँक ऑफ महाराष्ट्र राज्य कर्मचारी यांनी सहभाग नोंदवीला व निदर्शने करण्यात आली.

यामध्ये बॅक कर्मचारी कलर्क - अमोल शिंदे ,गोविंदा कुरकुटे ,अश्विनी खेडकर ,राज श्री रोकडे , विपीन गिरी , कृष्णा कवडे सतीश ढोकणे सुरेश खारगे,बाळासाहेब ससाने वसंत कांबळे हे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## पाच वर्षाच्या सुलेमान सय्यद चा पहिला रोजा पुर्ण



कडा (प्रतिनिधी)

मुस्लिम धर्मात पवित्र रमजान महिन्याला खूप महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे आष्टी तालुक्यातील कडा येथील अंगणवाडीत शिक्षण घेणारा सुलेमान सलमान सय्यद वय वर्ष ५ या चिमुकल्याने त्यांच्या आयुष्यातील पहिला रोजा दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे यशस्वी पुर्ण केल्याबद्दल चुलते शाकेर सय्यद,फिरोज सय्यद, आरिफ सय्यद सह नातेवाईक व इतरांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले.



पैठण (प्रतिनिधी)

नांदर ता पैठण येथील शिवाजीनगर येथील रहीवासी हुजेफ अफजल पठाण या ८ वर्षीय मुलाने केला पहीला रमजानचा उपवास केला वयाचा ८ वर्षीय हुजेफने रमजानचा पहीला उपवास केल्याने हुजेफ च्या आई वडीलांनी व त्याचे शेजारी तसेच गावातील नागरिकांनी हुजेफचे भरभरुन कौतुक केले व वडील अफजल पठाण,अजहर पठाण,अलीम पठाण,अन्सार सय्यद, या सर्वांनी त्याचे अभिनंदन करुन त्याला शुभेच्छा दिल्या




## वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने वडवणी ते चिंचोटी रस्त्यासाठी जागरण गोंधळ रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आमदाराच्या दारासमोर जगरण गोंधळ घालणार: विनोद काकडे

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी ते चिंचोटी रस्त्यावरील मोठमोठ्या पडल्याने मोठी वाहन धारकांना मोठी कसरत करावी लागत आहे खड्ड्यात काल जागरण गोंधळ घालण्यात आला. रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवावे व या रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आमदारांच्या दारासमोर जागरण गोंधळ घालण्याचा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी दिला आहे.

वडवणी चिंचोटी पाच कि मी रस्ता आहे.यातील दोन कि मी काम झाले व तिन किलोमिटरच्या रस्त्यावर मोठ मोठे खड पडल्याने या रस्त्याची दयनिय आवस्था झाली आहे.या रस्त्यावरून जातांना प्रवाशांना जिवघेणा प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यासाठी प्रशासनाला वेळो वेळी निवेदने दिलेले आहेत परंतु याकडे सपशल दुर्लक्ष केले जात आहे.या झोपलेल्या प्रशासनाला जाग करण्यासाठी वडवणी चिंचोटी रोडवरील खड्यात जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.आम्ही तात्काळ खड्डे बुजवण्यासाठी निधीचा प्रस्ताव व रस्ता मंजुरी साठी प्रस्ताव वरीष्ठांकडे पाठऊ असे लेखी निवेदन आंदोलकांना देण्यात आले.

## ग्रामसेवक पवार ११ हजाराची लाच घेताना चतुर्भुज

माजलगाव(प्रतिनिधी)

तालुक्यातील शिंपेटाकळी ग्रामपंचायतचा लाचखोर ग्रामसेवक विजय गोपीनाथ पवार याला लाचलुचपत पथकाने माजलगाव शहरात रंगेहाथ पकडले.शिंपेटाकळी ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास घरकुल योजनेचे ११४ घरकुल मंजूर झाले आहेत. परंतु सदर ग्रामविकास अधिकारी प्रती घरकुल १० ते १५ हजार रुपये मागत असल्याचे वारंवार निदर्शनास आले होते. माझे पंचायत समिती काही काहीही करू शकत नाही व खुशाल तक्रार करा,असे देखील तो वारंवार लाभार्थ्यांना धमकावत असे.सदर प्रकरणात घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी पैशाची मागणी करण्यात आली होती.तक्रारदार परीस्थितीमुळे पैसे देवू शकत नव्हते.त्यामुळे त्यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून या संदर्भातली तक्रार केली होती. बुधवारी सायंकाळी ५च्या सुमारास पवार यास माजलगाव शहरातुन ताब्यात घेण्यात आले.



शिंपेटाकळी गावातील अनेक नागरीकांनी पवार याची वारंवार तक्रार करूनही त्यावर कसल्याही प्रकारची कारवाई गटविकास अधिकाऱ्यांनी केली नसल्याने हा प्रकार घडला असावा,अशी चर्चा सबंधित गटविकास अधिकारी कार्यालय,सरकारी व निमशासकीय कार्यालयात होत आहे.यावरुन तरी तालुक्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी काही बोध घ्यावा.असे सर्व सामान्य जनतेतून अपेक्षित आहे.




**बीड (प्रतिनिधी)**

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भयु जोशी यांनी मुंबईत मराठी बोलण्याची गरज नाही व गुजराती बोला हे बोलल्यामुळे त्यांच्या या विधानाचा निषेध करण्यासाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब व संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भय्यु जोशी व भाजपचा जाहीर निषेध करून त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.**

## आजपासून ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यासाठी विशेष मोहीम – तालुका कृषी अधिकारी पुष्पराज खोत

धर्माबाद (अशोक पडोळे)

आधार कार्डप्रमाणे आता केंद्र सरकारने शेतकरी ओळख क्रमांक मिळविण्याबाबतची नोंदणी सुरू झाली आहे. धर्माबाद तालुक्यात शेतकऱ्यांची संख्या अंदाजे ३० हजार इतकी असून या रसीळींींरलज्ञ च्या माध्यमातून खऱ्या अर्थाने शेतकऱ्याना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळणे सोईचे होणार आहे.

राज्यामध्ये कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने वापर व परिणामकारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची 'ॲग्रिस्टॅक' योजना राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी नागरी सुविधा केंद्रामार्फत मदत घेऊन शेतकरी ओळख क्रमांक निर्माण करावयाची असून शेतकऱ्यांसाठी हा प्रकल्प फायद्याचा आहे.

ॲग्रिस्टॅक' काढल्यामुळे थोडक्यात शेतकरी ओळखपत्राच्या माध्यमातून शेती क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शेतकऱ्यांना खूप फायदा होऊ शकतो.



शेतकरी योजनांमधून कर्जासारख्या सेवेचा लाभ घेण्यासाठी याचा फायदा होणार असल्याचे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याची नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

ग्रीस्टॅक ही एक क्रांतिकारक संकल्पना आहे जी शेतकरी, ग्राहक, विक्रेते आणि सरकार यांना एकत्र आणते. यात सर्व शेतकरी बांधवांना एक विशिष्ट क्रमांक दिला जाईल. आधार क्रमांक प्रमाणे हा ींपळींश क्रमांक असून एप्रिल २०२५ पासून शेतीविषय कोणतेही शासकीय लाभ घ्यायचे असतील तर हा क्रमांक अनिवार्य असणार आहे; तसेच यापुढे शेतकरी ओळख क्रमांक असल्याशिवाय पीएम किसान योजना,पिक विमा योजना व इतर कृषि विभागाशी निगडित कुठल्याही योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असेल अन्यथा कोणत्याही स्वरूपाच्या योजनेचा लाभ मिळणार नाही; तसेच यापुढे सर्व प्रकारच्या कृषि विभागाचे योजना घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असेल. आपले शेतकरी ओळख क्रमांक तयार असल्यास आपणास सर्व प्रकारच्या योजना घेण्यासाठी कागदपत्राची कटकट कमी होणार आहे त्यामुळे जलद प्रशासन होण्यास मदत होईल.

तेंव्हा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी ०८ मार्च ते १३ मार्च २०२५ या कालावधीतील विशेष मोहिमेअंतर्गत आयोजित कॅपमध्ये शेतकऱ्यांनी आपले फार्मर आयडी काढून घ्यावे असे आवाहन तालुका कृषि अधिकारी पुष्पराज खोत यांनी केले आहे.






राज्यातील अनेक भागात सध्या भाजीपाल्याचे दर उतरले आहेत. बटाटे, कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, मिरचीला मोठा भाव नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यांचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.राज्यातील अनेक भागात भाजीपाल्याचे दर कोसळले आहेत.

**३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंबड जि. जालना यांच्या न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क ६२/२०२५**
**बानोबी व ईतर वि निरंक**
**नि.कं ०६**
**पुढील तारीख ०७/०४/२०२५**

अर्जदार

१) बानोबी अब्दुल रउफ शेख

२) फेरोज अब्दुल रउफ शेख

३) फारुख अब्दुल रउफ शेख सर्व रा. दुनगाव दर्गा ता. अंबड जि. जालना

४) परवीन अफजलखा पठाण रा. महारटाकळी ता. गेवराई जि. बीड

कलम :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

अर्जदार यांनी विधीज्ञ यांच्यामार्फत या न्यायालयात असा अर्ज केला आहे की, अर्जदार क १ यांचे नामे अब्दुल रउफ अजीज शेख हे दिनांक ०६/०३/२०२४ रोजी अब्दुल रउफ अजीज शेख यांचे एकमेव वारस आहे. अर्जदारास

पती व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील मयत झाले असुन अर्जदार हे मयत नामे

शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटन द्वारे सर्वत्र कळविण्यात येते की या बाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायदया प्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०६/०३/२०२५ रोजी यांची माझ्या सहीनीशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

| स्वाक्षरित/- | | स्वाक्षरित/- |
|---|---|---|
| **दिवाणी विभाग प्रमुख** | शिक्का | **अधीक्षक** |
| ३ रे सह दिवाणी न्यायालय | | दिवाणी न्यायालय |
| (क.स्तर) अंबड जि.जालना | | (व.स्तर) अंबड जि.जालना |

## जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभर 'विशेष ग्रामसभा' महिला व बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे



मुंबई (प्रतिनिधी)

महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, बालविवाह होऊ नये यासाठी लोकचळवळ राबविणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणे गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या विशेष ग्रामसभेमध्ये स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि नागरिकांनी महिलांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे. महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि मुलभूत हक्कांसाठी लढा देण्याची महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आजच्या काळातही महिलांसाठी न्याय आणि सुरक्षा देणे तसेच प्रत्येक गाव आणि खेड्यापर्यंत महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून बालविवाह, जाचक विधवा प्रथा, अन्यायकारक अंधश्रद्धा यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच मुलींच्या जन्मदर वाढीसाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

## जिल्हाध्यक्षपदी अमजद शेख सचिवपदी शेख वसीम तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी शेख ताहेर आणि सचिवपदी शेख अब्दुल तर महिला जिल्हाध्यक्षपदी शेख आयेशा तर प्रा. अनुप्रिता मोरे यांची सचिवपदी निवड

● बीड जिल्हा कार्यकारिणी ●










बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक ७ मार्च रोजी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा कार्यालय येथे पार पडली. या बैठकीत नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी सर्वानुमते बीड जिल्हाध्यक्षपदी अमजद शेख तर सचिवपदी शेख वसीम यांची निवड करण्यात आली.तसेच पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी शेख ताहेर आणि सचिवपदी शेख अब्दुल तर महिला जिल्हाध्यक्षपदी शेख आयेशा यांची निवड जाहीर करण्यात आले.

● पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती ●







● पत्रकार संघ महिला आघाडी ●







**आज मान्यवरांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देण्यात येणार**

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक ७ मार्च रोजी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा कार्यालय येथे पार पडली. या बैठकीत नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी सर्वानुमते बीड जिल्हाध्यक्षपदी अमजद शेख तर सचिवपदी शेख वसीम यांची निवड करण्यात आली.तसेच पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी शेख ताहेर आणि सचिवपदी शेख अब्दुल तर महिला जिल्हाध्यक्षपदी शेख आयेशा यांची निवड जाहीर करण्यात आले. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आज मान्यवरांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्याची जबाबदारी सोपवण्यात येणार आहे.

आज दिनांक ८ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात येणार आहे. हॉटेल नीलकमल येथे मान्यवरांच्या शुभहस्ते पत्रकार संघाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येणार आहेत. सदरील निवडी या पत्रकार संघाचे संस्थापक तथा प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव यांच्या आदेशानुसार पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी बीड जिल्हा बैठकीत खेळीमेळीच्या वातावरणात सर्वानुमते बीड जिल्हा कार्यकारणी निश्चित करून जाहीर केली.

सर्वांमध्ये निवड करण्यात आलेल्या नवनियुक्त बीड जिल्हा कार्यकारणी मध्ये जिल्हाध्यक्षपदी अमजद खान, जिल्हा सचिव पदी शेख वसीम,जिल्हा उपाध्यक्षपदी रईस खान,बापू गाडेकर, जगन्नाथ परझणे, संघटकपदी शेख अय्युब,कार्याध्यक्षपदी अमोल कापसे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी राम काशीद तर जिल्हा संपर्कप्रमुखपदी नितेश उपाध्ये यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली.तसेच यावेळी सर्वानुमते पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शेख ताहेर, सचिव पदी शेख अब्दुल,उपाध्यक्षपदी शेख वसीम, संघटक पदी शेख सलमान, कार्याध्यक्षपदी सिद्धांत मोरे, प्रसिद्धी प्रमुख पदी संजय लंगे पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे शहराध्यक्षपदी सचिन बोबडे तर कायदेशीर सल्लागारपदी अँड नितीन पवार यांची निवड निश्चित करण्यात आली.

त्याचबरोबर पत्रकार संघाची महिला कार्यकारणी पहिल्यांदाच निश्चित करून जाहीर करण्यात आली बीडच्या पहिल्या महिला जिल्हाध्यक्ष म्हणून सर्वानुमते शेख आयेशा यांची निवड करण्यात आली तर सचिव म्हणून प्रा. अनुप्रिता मोरे तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी नायरा मुळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी नंदा भंडारी आणि कोषाध्यक्ष पदी आरती विजय कोरडे यांच्या निवडी निश्चित करून जाहीर करण्यात आल्या. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आज मान्यवरांच्या शुभहस्ते पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

### संघटनेच्या माध्यमातून आगामी काळात विधायक कार्य करू - वैभव स्वामी

या बैठकीत वैभव स्वामी यांनी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी संघटन बळकट करण्याचे महत्त्व सांगितले. पत्रकारांवरील हल्ले आणि अन्याय रोखण्यासाठी पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अधिक सक्रीय राहील असे ही त्यांनी स्पष्ट करून भविष्यात पत्रकार संघाच्या माध्यमातून विधायक कार्य पत्रकार म्हणून आपण सर्वजण मिळून करू अशी अपेक्षा व्यक्त केली. तर नवीन कार्यकारिणीने पत्रकारांच्या हक्कांसाठी संघर्ष करू आणि त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधू,पत्रकार संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबवू,स्थानिक पत्रकारांचे संघटन मजबूत करणे,पत्रकारांवरील अन्याय आणि हल्ल्यांविरोधात ठोस भूमिका घेणे असे उद्दिष्ट नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आगामी काळात पूर्ण करून असे निश्चित केले.नवीन कार्यकारिणीच्या निवडीनंतर बीड जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ही टीम स्थानिक पत्रकारितेच्या सशक्तीकरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गल्लीपासून दिल्लीपर्यंत पवनचक्की कंपन्यांना सरकारचे अभय

## पण पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाहीमुळे पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण ? केंद्रीय ऊर्जा मंत्री श्रीपाद नाईक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तक्रार - डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

पवनचक्की कंपन्यांना काही समाजकंटकां त्र कडुन त्रास दिला जात असल्याची तक्रार ४६ पवनऊर्जा कंपन्यांची संघटना असलेल्या विपा ने केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना केली आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी बीड यांना पत्र पाठवून कंपन्यांना त्रास देणारांचा बंदोबस्त करावा असे लेखी आदेश दिले आहेत. पवनचक्की कंपन्यांना त्रास देणारे, खंडणीखोर यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी मकोका अंतर्गत कारवाई व्हायला हवी याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याचे स्वागतच आहे मात्र याचवेळी बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक, दडपशाही, शासनाची दिशाभूल करणे,पोलिस प्रशासनाच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करणे आदी घटना घडत असताना या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समितीचे स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांचे निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.



पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभाग अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार सचिव आहेत.

पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव करून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

# शिरूर मधील सर्व शेतरस्ते महसुल अभिलेखात नोंद होणार - श्री.घोळवे

(शिवराम राऊत यांच्या अनेक वर्षांच्या मागणीला यश )

शिरूर (प्रतिनिधी)

शिरूर तालुक्यातील शेतक-यांना सुस्थितीत शेतरस्ते नसणे हि प्रमुख समस्या विचारात घेता.शिवराम राऊत यांच्याकडून अनेक वर्षापासुन या बाबतीत संघर्ष व पाठपुरावा चालू असतो.सद्यस्थितीत वापरातील,शेतरस्ते,पायवाट,गाडीरस्ते,नंबरबांधरस्ते,सर्वे नं. रस्ते, वस्ती जोड रस्ते, शीव रस्ते, हे वापरात अनेक वर्षापासुन असतात परंतू त्यांची शासनाच्या महसुल अथवा भूमी अभिलेख मधील प्रमाणित नकाशात नोंदच नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात.यामधील प्रमाणित दस्तावेज नसल्याने या रस्त्याचे मजबुतीकरण,पांदन रस्ते योजना,खडीकरण,मजबुतीकरण,व विविध योजनेच्या लाभ देता येत नाही.तसेच काही खोडकर शेतकरी रस्ता आडवणे, अतिक्रमण करणे,बांधरेटणे, रस्ते विकास कामात संमती न देणे, यामुळे शेती वहिवाटीस अडथळा निर्माण होऊन शेतक-यांतील संघर्ष विकोपाला जातो. काहि राजकिय हेवेदावे, जूण्या भांडणाच्या




कुरापती मधून शेतक-यांना वहिवाटीस व येण्या- जाण्यास मज्जाव करणे यामुळे महसुली प्रशासनाने किमान हिवरसिंगा सज्जा अंतर्गत सद्यस्थितीत वापरातील सर्व प्रकारच्या रस्ते प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्यांचा पंचनामा करून त्या-त्या गट नं.,सर्वे नं.च्या इतर हक्कात सदरील रस्ता प्रकार,त्यांची लांबी-रुंदी यांच्या नोंदी घ्यावी व भूमी अभिलेख कार्यालयातील गाव नकाशात प्रमाणित करण्यासाठी सहकार्य करावे यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष शिवराम राऊत,उपाध्यक्ष श्री.माऊली शिंदे.यांनी शिरूर तालुक्याचे तहसिलदार श्री.घोळवे यांची भेट घेऊन या विषयी मागणी करताच.संबधित यंत्रणेला सुचित करत पूर्ण तालुक्यातील मंडळाधिकारी,तलाठी व गाव रस्ता समितीच्या माध्यमातुन प्रचलित वहिवाटीत असणारे सद्यस्थितीला रस्ते पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.लवकरच या संबंधी कार्यवाही पुर्ण करून हिवरसिंगा सह तालुक्यातील प्रत्येक सज्जातील रस्ते नोंद करण्याचे तहसिलदार घोळवे यांनी अश्वासित केले.

# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या गुन्हयात निष्पन्न आरोपीस आर्थिक गुन्हे शाखेने केले अटक

बीड (प्रतिनिधी)

ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बीड मधील तपासामध्ये निष्पन्न आरोपी अमोल शिवाजी परसकर हा बीड शहरात येत असले बाबत गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहीतीवरुन विश्वांबर गोल्डे पोलीस उपाधीक्षक आर्थीक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी रत्नाकर, सहा. पोउपी मच्छींद्र -११६०, पोह. विठठल-१३४३ पोलीस अंमलदार संजय- २२९२ यांचे एक पथक तयार करुन, सापळा कारवाई करुन आरोपीस ताब्यात घेवून दिनांक १५/०२/२०२५ रोजी १०:२५ वा अटक करण्यात आली.सदर आरोपीचा १४ दिवस न्यायालयाकडून पी.सी.आर. प्राप्त करुन तपास करण्यात येत आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बीड या वित्तीय संस्थेच्या बीड जिल्हयात एकुण २३ शाखा असून सदर मल्टीस्टेटचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ व अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द बीड जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये आजपावेतो ७४ गुन्हे दाखल झालेले असुन सदर ७४ गुन्हयाचे फिर्यादी मधील एकूण रक्कम ४८,५१,७२,०२३ रुपयाचा अपहार झाल्याचे तक्रारीमध्ये नमुद आहे. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बीड मध्ये ठेवी ठेवलेल्या ठेवीदारापैकी ११,२११ ठेवीदारांनी त्यांचे ठेवीबाबत अर्ज व कागदपत्रे दिलेली असुन अर्जमध्ये अपहार झालेली रक्कम ६३६,२६,९१,४७५/ -रुपये रकमेचा विश्वासघात व फसवणुक झाले बाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहे. त्यावरुन गुन्हयाचे तक्रारीमधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण ६८४,७८,६३,४८०/-रु रकमेची फसवणुक झाले बाबत माहीती प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठेवीदार यांचे तक्रारी अर्ज स्वीकारण्यासाठी आर्थीक गुन्हे शाखा बीड येथे एक स्वतंत्र पथक तयार करण्यात आलेले आहे.ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी ली. बीड मधीलचे विविध गुन्हयामध्ये फरार आरोपी नामे अर्चना सुरेश कुटे यांचेबाबत अटक आरोपीकडून माहीती घेवुन सदर आरोपीचा शोध घेणेसाठी आर्थिक गुन्हे शाखा येथील अधिकारी, अंमलदार यांची वेगवेगळे पथके तयार करण्यात आलेली असुन, सदर पथके आरोपीच्या मागावर असुन पुणे, सोलापुर व इतरत्र ठीकाणी जावुन आरोपी अर्चना सुरेश कुटे व इतर आरेपीतांचा शोध घेत आहेत.सदर आरोपी अटकेबाबतची कामगीरी मा. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छ. संभाजीनगर परीक्षेत्र, मा. नवनीत कॉँवत, पोलीस अधीक्षक बीड मा. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, विश्वांबर गोल्डे उविपोअ बीड तथा पोलीस उपाधीक्षक आर्थीक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोनी संतोष, सहा. पोलीस निरीक्षक रत्नाकर, सहा. पोउपी मच्छींद्र-११६०, पोह. विठठल-१३४३ पोलीस अंमलदार संजय- २२९२ तसेच टेक्नीकल सेल चे पोह-आसीफ १५४६ पोह अश्वीन-२०६८ यांनी पार पाडलेली आहे.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

जागतिक महिला दिन विशेषांक २०२५

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बीड(महाराष्ट्र) | दैनिक मराठी | वर्ष ५ वे । अंक-१८२ | शनिवार,दि.०८ मार्च २०२५ | ९८ २२ ६२ ८५ २१ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | । किंमत ३ रुपये | । पाने ४
Beed | Daily Marathi | Year 5 Th Issue-182 | Date 8 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# महिलांच्या वेदनांना समूळ नष्ट करणारे डॉ.मीरा प्रशांत ढाकणे (नागरे)

## यांचे मूळव्याध भगंदर स्पेशालिस्ट हॉस्पिटल म्हणजे 'शिवसमर्थ'



### बुलढाणा जिल्ह्यातील सावखेड तेजनची पहिली डॉक्टर शेतकरी कन्या ते बीड जिल्ह्यातील पहिल्या मुळव्याध तज्ञ डॉक्टर होण्याचा बहुमान डॉ.मीरा ढाकणे यांनाच!!

बुलढाणा जिल्ह्यातील सावखेड तेजन तालुका सिंदखेड राजा येथील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या मीरा नागरे यांनी कॉलेज दशेमध्येच डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले. मूळव्याधाचे दुखणे किती अवघड असते त्यातलेत्यात जर हा आजार महिलेला झाला तर किती त्रास सहन करावा लागतो ही बाब लक्षात घेऊन महिलांच्या या वेदनांना समूळ नष्ट करण्यासाठी डॉक्टर मीरा नागरे (ढाकणे) यांनी पाहिलेले स्वप्न मोठ्या जिद्दीने पूर्ण केले. त्यांच्या या उत्तुंग भरारीमुळे त्या सावखेड तेजन या अतिशय ग्रामीण भागातील खेड्यातील पहिल्या शेतकरी कन्या डॉक्टर बनू शकल्या. एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यातील बी ए एम एस आणि पुढे मुळव्याध, भगंदर स्पेशालिस्ट म्हणून त्यांनी एम एस गव्हरमेंट आयुर्वेद कॉलेज नांदेड येथून डॉक्टरेट मिळवल्यानंतर बीडमध्ये पहिले शिवसमर्थ हे मुळव्याध, भगंदर स्पेशालिस्ट हॉस्पिटल सुरू केले. आता महिलांना आपल्या अवघड जागच्या वेदनांना तज्ञ असलेल्या महिला डॉक्टर यांच्या मार्फत न लाजता न लपवता आपल्या वेदनांना समूळ नष्ट करण्याची संधी उपलब्ध झाली आहे... डॉ.मीरा ढाकणे यांच्या आयुष्याचा जीवनपट कसा सुरू झाला हे जागतिक महिला दिनानिमित्त त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर घेतलेल्या मुलाखतीतून त्यांच्याच शब्दात त्यांचा जीवनपट उलगडण्याचा हा छोटासा प्रयत्न दैनिक समर्थ राजयोगच्या मुलाखतीतून केला आहे...









### टॉपर आल्याने मला शैक्षणिक सवलत मिळू शकली...

डॉक्टर होण्यासाठी बी ए एम एस मध्ये प्रवेश केल्यानंतर मी खडतर प्रयत्नाने अभ्यास केला. पहिल्याच वर्षी मी नाशिक विद्यापीठामध्ये टॉपर ठरले. त्यामुळे मला हॉस्टेलची फीस माफ झाली आणि शैक्षणिक सवलत मिळाली. त्यामुळे पुढचे शिक्षण अधिक सोयीचे झाले. एवढेच नव्हे तर मी टॉपर आल्यामुळे प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर संध्या विजय कोठारी यांच्या हॉस्पिटलमध्ये मला थेट प्रॅक्टिस करण्याची संधी मिळाली. आणि त्यांनी माझे धाडस वाढवले.

### हिमालया अवार्ड मिळाला आणि मी धन्य झाले...

मी बी ए एम एस प्रथम वर्षामध्ये टॉपर ठरले होते. त्यावेळी आमच्या प्राध्यापिका डॉक्टर वैशाली साळवे यांना आयुर्वेदातील हिमालया हा अवॉर्ड मिळाला होता. त्यांचा तो सोहळा माझ्या स्वप्नांचा भाग झाला. मी देखील त्याचवेळी हिमालया हा आवार्ड प्रयत्नातून मिळवायचा आणि तो वडिलांच्या सोबत घ्यायचा हे प्रथम वर्षात असलेले स्वप्न मी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शेवटच्या वर्षी केले आणि माझ्या वडिलांसोबत जाऊन मी हिमालया हा आवार्ड स्वीकारला. त्यावेळी व्यासपीठावर वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू पाहिले आणि त्याच क्षणी मला माझ्या जीवनाचे सार्थक झाले याचे समाधान मिळाले.

वैभव स्वामी । बीड
मो.९८२२६२८५२१

शेख आयेशा रफिक । बीड
मो.७०३०१४९३२२

**आपला थोडक्यात परिचय सांगा..?**

मी डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे (नागरे). माझा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यामधील सावखेड तेजन या खेड्या गावात शेतकऱ्याच्या पोटी झाला. आम्ही बहीण भाऊ दोघेही शिक्षणाची आवड असल्याने गावाच्या बाहेर पडून उच्च शिक्षण घेतले. यासाठी शेतकरी असलेल्या वडिलांनी आणि हाऊस वाईफ असलेल्या आईने दिलेले पाठबळ आणि काकाने दिलेली खंबीर साथ यामुळेच आज आम्ही इथपर्यंतचा प्रवास यशस्वी करू शकलो आहोत.

**आपले शिक्षण कशा परिस्थितीत आणि कसे झाले..?**

माझे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या सावखेड तेजन या माझ्या गावातच झाले. पुढे गावातच जनता माध्यमिक विद्यालयात शिक्षण झाले. त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण हे दिनदयाल विद्यालय देऊळगाव राजा येथे झाले. बारावी विज्ञान शाखेमध्ये चांगले गुण मिळाले मात्र एमबीबीएस ला नंबर लागला नाही. पण खचून न जाता डॉक्टर होण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी चिखली येथील एसआरसी आयुर्वेद कॉलेज मध्ये शासकीय कोठ्यातून बी ए एम एस २०१८ मध्ये पूर्ण केले. पुढे मुळव्याध आणि भगंदर मध्ये एम एस पूर्ण करण्यासाठी गव्हर्नमेंट गव्हर्मेंट आयुर्वेद कॉलेज नांदेड येथे प्रवेश केला आणि गुणवत्तेत २०२३ मध्ये एम एस पूर्ण केले.

**वडील शेतकरी आणि आई घरकाम करणारी असताना देखील आपण डॉक्टरी पेशाकडे नेमके कसे वळालात..?**

मला लहानपणापासूनच शिक्षणाची खूप आवड होती. मात्र खेड्या गावामध्ये मुलगी वयात आली की लग्न करण्याची रीत होती आणि आज ही ती कमी प्रमाणात पण आहे. मला लहानपणा पासूनच लग्न करण्यासाठी नातेवाईकांची घाई सुरू झाली. पण शेतकरी असलेल्या माझ्या वडिलांना मी पुढे खूप मोठ शिकावं डॉक्टर व्हावं ही इच्छा होती. त्यांनी कोणत्याही नातेवाईकांचं न ऐकता माझ्या पाठीशी उभे राहिले आणि शिक्षणावर ऐपत नसताना देखील खर्च केला. माझ्या लग्नाची घाई केली नाही. म्हणून मला उच्च शिक्षण घेता आले. आणि वडिलांनी पाहिलेलं मी डॉक्टर होण्याचं स्वप्न मला पूर्ण करता आलं. माझ्या वडिलांनी मला तर डॉक्टर केलंच पण माझा भाऊ ज्ञानेश्वर नामदेव नागरे याला देखील इंजिनीयर केले. जेव्हा माझा नंबर डॉक्टरला लागला तेव्हा वडील इतके आनंदी झाले होते की त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू सुरू झाले होते. मी डॉक्टर झाल्यापासून माझ्या वडिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन आता सगळ्यांचा बदलला आहे.

**मुळव्याध तज्ञ होण्याचा निर्णय आपण नेमका कसा आणि का घेतला ?**

मी बीएएमएस करत असताना आमच्या प्राध्यापिका डॉक्टर सूर्यवंशी मॅडम यांचे आशा प्रकाश पाइल्स क्लिनिक हे हॉस्पिटल होते.त्या खूप वक्तशीर आणि शिस्तप्रिय होत्या. त्या आपला वेळ कधीच वाया जाऊ देत नसत.त्यांची कॉलेजमध्ये एक वेगळी छाप इमेज निर्माण झाली होती. त्यामुळे त्या सर्वांच्या आयडियल होत्या.



त्यामुळे त्यांना पाहिलं की मला देखील त्यांच्यासारखंच आयडियल आपणही व्हावं असं मनातून वाटलं. त्याच क्षणी निर्णय घेतला की आपण देखील डॉक्टर सूर्यवंशी मॅडम यांच्याप्रमाणेच मुळव्याध तज्ञ एक आदर्श डॉक्टर व्हायचं आणि त्यानुसार पुढे मी बीएएमएस पूर्ण झाल्यानंतर नांदेड गव्हर्नमेंट आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये एम एस पाइल्स मध्ये करण्यासाठी प्रवेश घेतला एमएस पूर्ण करून मी मुळव्याध तज्ञ डॉक्टर होऊन पाहिलेले स्वप्न पूर्ण केले.

**कुटुंबात कोणी वैद्यकीय क्षेत्रात होते का? डॉक्टर होण्यासाठी आपणास कोणाकोणाची अमूल्य साथ आणि योगदान मिळाले ?**

मी माझे डॉक्टर होण्याचे सर्वस्वी श्रेय माझ्या शेतकरी असलेल्या नामदेवराव नागरे वडिलांना देते. त्यांच्या एवढेच सहकार्य मला इतरांचे देखील त्या त्या काळात मिळत गेले. त्यामध्ये प्रामुख्याने माझा लहान भाऊ ज्ञानेश्वर नागरे तसेच माझे दोन आत्ते भाऊ त्यामध्ये शिक्षक असलेले गजानन सटवाजी जायभाये आणि ग्रामसेवक असलेले गणेश सटवाजी जायभाये या दोघांनी जी मदत केली त्यामुळेच मी खऱ्या अर्थाने डॉक्टरेट पूर्ण करू शकले.त्यासोबतच माझे शिक्षक वनश्री जनाबाबू म्हेत्रे यांनी मला वेळोवेळी जे प्रोत्साहन दिले म्हणूनच मला पुढे मार्ग मिळत गेला. आईची देखील तोलामोलाची साथ मिळाली. या सर्वांमुळे तर माझा पल्ला पुढे सरकलाच परंतु मुळव्याध तज्ञ होण्याचे स्वप्न खऱ्या अर्थाने माझे पती प्रशांत ढाकणे यांच्यामुळे पूर्ण होऊ शकले.

**आपला विवाह योग कसा आणि कधी जुळून आला? लग्नानंतर मुळव्याध तज्ञ होण्याचे स्वप्न नेमके कसे पूर्ण झाले ?**

माझे बी ए एम एस डॉक्टरेट पूर्ण झाल्यानंतर आईने लग्नाचा तगादा सुरू केला. वडिलांना देखील माझे लग्न



व्हावे असे वाटू लागले.तेव्हा आमच्या कुटुंबीयांनी माझा बायोडाटा तयार करून तो रीती धर्म परंपरेनुसार शेअर केला. माझा बायोडाटा पाहून मला पहिले स्थळ हे बीड येथील प्रशांत ढाकणे यांचे आले. ते स्वतः एमबीबीएस डॉक्टर होते आणि मला देखील माझा जोडीदार हा बीएएमएस किंवा एमबीबीएसच असावा असे स्वप्न होते.त्यात थेट एमबीबीएस असलेले स्थळ अरेंज मॅरेज नुसार चालून आल्याने दुधात खडीसाखरच पडली. धार्मिक परंपरेनुसार मुलगी दाखवण्याचा योग जुळून आला. डॉक्टरांनी मला पाहिल्यानंतर लगेच लग्नासाठी होकार दिला आणि आमचे २२ जुलै २०२१ मध्ये विवाह योग जुळून आले. लग्नानंतर मी डॉक्टरांना मला मुळव्याध तज्ञ पुढे व्हायचे आहे ही इच्छा व्यक्त केली. त्यांनी लगेच पुढील पीजी चे शिक्षण घेण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आणि माझा नांदेड येथील गव्हर्मेंट मेडिकल कॉलेजला नंबर लागला. याचे सर्वस्वी श्रेय मी डॉक्टरांना देते. त्याचवेळी डॉक्टरांना देखील पुढे



भुलतज्ञ होण्यासाठी गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज धुळे येथे नंबर लागला.आम्ही दोघेही लग्न नवीन झालेले असताना देखील पुढील शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी नांदेडला आणि ते धुळे येथे गेले. विवाह बंधनात नव्याने अडकून देखील आम्ही शिक्षणाला आधी महत्व दिले आणि दोघांनीही पीजी पूर्ण केली.

**मुळव्याध तज्ञ झाल्यानंतर पुढे काय करायचे ठरवले ?**

आमच्या डॉक्टरांचे गाव म्हणजे माझे सासर हे खापर पांगरीचे.सासरे शहादेव ढाकणे सर हे मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. तर सासू पुष्पा शहादेव ढाकणे ह्या हाऊस वाइफ आहेत. दोघेही बीड येथे राहतात. आम्ही शिक्षणासाठी बाहेर होतो. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपला मुलगा सून आपल्या शहरात आपल्या जवळ असावे अशी त्यांची इच्छा होती. डॉक्टरांची देखील आई-वडिलांची इच्छा पूर्ण करण्याची मानसिकता होती. त्यामुळे मी देखील त्यांना सासू-सासरे न मानता आई-वडीलच मानत असल्याने बीडमध्येच आपल्या शिक्षणाचा फायदा येथील खऱ्या गरजूवंत महिलांना झाला पाहिजे हे मनात निश्चित करून बीड येथील डॉक्टर लाईन म्हणजेच राजीव गांधी मार्गावरील गिरी हॉस्पिटल जवळ किरायाची जागा शोधून हॉस्पिटल टाकण्याचा निर्णय घेतला आणि आम्ही शिवसमर्थ या नावाने मुळव्याध , भगंदर तज्ञ हॉस्पिटल १६ जून २०२४ मध्ये सुरू केले. विशेष बाब म्हणजे हॉस्पिटलचे नाव देखील डॉक्टर आणि मी दोघांच्या विचारातून आई-वडिलांच्या चर्चेतून निश्चित करण्यात आले.मला जे नाव हॉस्पिटलचे अपेक्षित होते तेच आमच्या एक विचारातून पुढे आले. याचा सर्वाधिक आनंद आहे. विशेष बाब म्हणजे हॉस्पिटल सुरू करताना अवघ्या दोन महिन्याचाच यथार्थ हा लहानगा मुलगा होता. परंतु त्याची जबाबदारी ही आईसह कुटुंबाने स्वीकारल्यामुळे मला हॉस्पिटलमध्ये खऱ्या अर्थाने वेळ देता येत आहे. याचा देखील वेगळा आनंद आहे.

**आपण बीड जिल्ह्यातील पहिल्या महिला मुळव्याध तज्ञ डॉक्टर आहात का? आणि हॉस्पिटल सुरू केल्यापासून रुग्णाबद्दल आलेला नेमका अनुभव काय सांगाल ?**

बी ए एम एस पूर्ण केल्यानंतर मी मुळव्याध भगंदर मध्ये एम एस शल्य व फिलोसिप झालेली कदाचित बीड जिल्ह्यातील पहिली महिला डॉक्टर असेल असा माझा अंदाज आहे. माझ्या आधी काही महिला डॉक्टर या मुळव्याध तज्ञ जिल्ह्यामध्ये असू शकतील. मात्र शास्त्र युक्त पद्धतीने डिग्री घेऊन मुळव्याध तज्ञ होण्याचं पीजीचे शिक्षण पूर्ण करून प्रॅक्टिस करण्यासाठी सुरुवात करणाऱ्या पहिल्या डॉक्टर म्हणून कदाचित माझे नाव असावे. असे मला इतर मूळव्याध तज्ञ डॉक्टर सांगतात मी माझ्या हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे.मी शिवसमर्थ मुळव्याध भगंदर हॉस्पिटल सुरू केल्यापासून खूप समाधानी आहे. या बीड जिल्ह्यामध्ये मुळव्याधाने त्रस्त असलेल्या महिलांची संख्या मोठ्या संख्येने आहे. मात्र पुरुष डॉक्टर कडे जाऊन दाखवण्याची लाज वाटत असल्याने अनेक महिलांनी वर्षानुवर्ष हा आजार लपवला. ३० - ३५ वर्ष हा आजार सहन केला. हे मला अवघ्या सात महिन्यातील रुग्णांची सेवा करताना त्यांच्यावर उपचार करताना वैद्यकीय अनुभवातून लक्षात आले. त्यामुळे मला खऱ्या अर्थाने बीड येथे प्रॅक्टिस सुरू केल्याचे समाधान मिळत आहे.

**आपण मुळव्याध तज्ञ होण्याचे स्वप्न पूर्ण केले, आता आपले पुढचे व्हिजन काय आहे ?**

मुळव्याध हा आजार महिला मोठ्या संख्येने लपवतात. असह्य होणारा त्रास सहन करतात. त्यांना अश्या या त्रासातून आजारातून मुक्त करणे हे माझे व्हिजन आहे.बीड जिल्ह्यातील गोरगरीब कुटुंबातील सामान्य रुग्णांना देखील अगदी कमी दरामध्ये या त्रासातून मुक्त करण्याचे मी ठरवले आहे. माझ्याकडे येणाऱ्या कोणत्याही मुळव्याध, भगंदरच्या पेशंटला ऑपरेशनची गरज पडू नये बिना ऑपरेशन त्यांचा आजार मुळापासून दूर व्हावा हे व्हिजन मी बीडमध्ये पूर्ण करणार आहे. पैसे कमावणे हा उद्देश नसून पेशंटला असह्य त्रासातून मुक्त करणे हेच माझे खरे व्हिजन आहे. त्यामुळे मी खरंच आर्थिक दृष्ट्या कमजोर असलेल्या पेशंटचे प्रसंगी विनामूल्य उपचार देखील करत आहे आणि करत राहणार आहे. मी जे हे क्षेत्र निवडले आहे त्यात मनातून



समाधानी आणि आनंदी आहे. पुढे भविष्यात गोरगरिबांचे विनामूल्य ऑपरेशन जयंतीच्या निमित्ताने किंवा विविध आरोग्य शिबिराच्या माध्यमातून विनामूल्य तपासणी शिबिर मी महिलांसाठी राबवणार आहे.

**जागतिक महिला दिनानिमित्त आपण महिलांना काय संदेश द्याल ?**

मुळव्याध हा आजार आता कॉमन आजार होत आहे.जवळपास ८५% नागरिक मूळव्याधाणे त्रस्त आहेत. त्यांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी डॉक्टर होणाऱ्या नवीन विद्यार्थिनींना माझा संदेश आहे की, तुम्ही मूळव्याध मध्ये पीजी पूर्ण करून महिलांना मुळव्याधाच्या त्रासापासून मुक्त करावे. तसेच महिलांनी देखील आपल्या आरोग्याची काळजी घरातील इतर सदस्यांप्रमाणेच स्वतःची देखील घ्यावी. जर घरातील महिला निरोगी असेल तर ते घर आनंदी, टवटवीत राहते.त्यामुळे माझा सर्व महिलांना या निमित्ताने संदेश असेल की तुम्ही स्वतः निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा...









जागतिक महिला दिन विशेषांक २०२५

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बीड(महाराष्ट्र) | दैनिक मराठी | वर्ष ५ वे । अंक-१८२ | शनिवार,दि.०८ मार्च २०२५ | ९८ २२ ६२ ८५ २१ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | । किंमत ३ रुपये | । पाने ४
Beed | Daily Marathi | Year 5 Th Issue-182 | Date 8 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# कुटुंबासाठी डोक्यावर टोपलं घेऊन कधीकाळी भाजी विकणाऱ्या अनिताताई वाघमारे आज निराधारांच्या आधार बनल्या...!

खेळण्या बागडण्याच्या वयात अवघ्या सातवी मध्ये लग्न झालं. कळत नव्हतं तेव्हा संसाराचं ओझं खांद्यावर आलं. ऐन उमेदीच्या उंबरठ्यावर असताना पती जे नगरपालिकेमध्ये स्वच्छता कामगार म्हणून सेवेत होते त्यांचेही अपघातामध्ये दुर्दैवी निधन झाले. ऐन उमेदीच्या काळात विधवा म्हणून जगताना आणि कुटुंबाला जगवताना जीवाच्या अनंत यातना सहन केल्या. प्रसंगी डोक्यावर भाजीपाला विकून पतीच्या जागेवर रस्ते नाली सफाईचे काम नगरपालिका अंतर्गत तब्बल १२ वर्ष केले. आपल्यासारख्या दु:खी असलेल्या विधवा, परितकता, निराधार महिलांना शासकीय सुविधा मिळाव्यात म्हणून सामाजिक कार्याला सुरुवात केली. या कार्यातून समाधान आणि आनंद मिळू लागला. तुटलेल्या संसाराचा गाडा एकाच चाकाने सक्षमपणे ओढणे सुरू झाले. आज त्याच संघर्षमय महिला अनिता वाघमारे या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात सक्रिय असून येणाऱ्या पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये जर ढेकणमोहा सर्कल राखीव झाले तर त्या जागेवरून पक्षाने संधी दिली तर निवडणूक लढवण्याची हिंमत या संघर्षमय महिलेने व्यक्त करून समाजा पुढे एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या संघर्षमय जीवनाची गाथा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने मुलाखतीमधून त्यांच्याच शब्दात मांडत आहोत.

वैभव स्वामी । बीड
मो.९८२२६२८५२१
शेख आयेशा रफिक । बीड
मो.७०३०१४९३२२







**आपला थोडक्यात परिचय ?**

मी अनिता गौतम वाघमारे माझा जन्म १ जानेवारी १९७४ मध्ये झाशी येथे झाला होता. माझ्या वडिलांनी आर्मीमध्ये २२ वर्ष देशसेवा केली. वडील दामोदर नामदेवराव गायकवाड आणि आई शहाबाई दामोदर गायकवाड.मला सात बहिणी आणि राहुल दामोदर गायकवाड हा एक भाऊ आहे. माझ्या वडिलांनी आर्मीच्या सेवानिवृत्तीनंतर शासकीय नोकरी मिळत असतानाही केवळ सेवेत असताना कुटुंबाकडे लक्ष देता आले नाही,त्यांना वेळ देता आला नाही म्हणून निवृत्तीनंतर घरीच राहणे पसंत केले.

**तुमचे शिक्षण किती आणि कशा परिस्थितीत झाले ?**

वडील आर्मी मध्ये देश सेवेत होते. त्यांची पगार जेमतेम होती. घरची परिस्थिती हालाखीची, त्यातच आम्ही तब्बल सात बहिणी आणि एक भाऊ असल्याने शिक्षण शिकणे अवघड होते. त्यामुळे मला लहानपणीच आजीजवळ ठेवण्यात आले. आम्ही मूळ आहेर वडगाव येथील मात्र मला शिक्षणासाठी आजीकडे म्हणजे वांगी या गावात ठेवण्यात आले. त्या ठिकाणी मी प्राथमिक शिक्षण चौथीपर्यंत पूर्ण केले. पुढे शाळा नव्हती मात्र शिक्षणाची आवड असल्याने पाली येथील शाळेमध्ये शेतातून पायी दररोज तीन ते चार किलोमीटर जाऊन शिक्षण घेतले. मी सातवी मध्ये असतानाच माझ्या आईच्या मामाच्या मुलासोबत म्हणजेच गौतम नामदेवराव वाघमारे यांच्या समवेत १९८४ मध्ये माझा विवाह झाला.

**इतक्या लहान वयात लग्नाचे योग नेमके कसे आणि का जुळून आले..?**

मला आजही थोडेफार आठवतं... थंडीचे दिवस होते... मी अगदी लहान होते... मामाची मुलं मुली आणि माझ्या समवयस्क मैत्रिणी आम्ही शेकोटी करून खोड्या करत शेकत बसलेलो होतो. त्यावेळी माझी आजी वडिलांना आणि काकांना म्हणाली अरे अनिताचा आणि गौतमचा जोडा छान दिसत आहे. या दोघांचे लग्न करायचे का ? एवढ्या एका वाक्यावर माझ्या वडिलांनी, काकांनी आणि आईच्या मामाने लगेच होकार दिला. त्यानंतर अवघ्या दोन महिन्यात माझे थेट लग्न झाले.त्या वयात मला साडी सुद्धा घालता येत नव्हती. लग्न झाल्यामुळे माझे पुढचे शिक्षण थांबले आणि मी एक विवाहित गृहस्थी झाले.

**आपल्या वैवाहिक जीवनाविषयी काय सांगाल..?**

माझे आजोळी म्हणजे मामाच्या वांगी या गावातच १९८४ मध्ये गौतम नामदेवराव वाघमारे समवेत लग्न झाले. लग्नानंतर सुद्धा मला शिक्षणाची आवड असल्याने मी वडगाव पासून पालीपर्यंत दररोज तीन किलोमीटर शेतातून ये जा करत शिक्षण केले. माझ्या शिक्षणाला माझ्या पतीने आणि सासरच्या मंडळीने कधी विरोध केला नाही. मात्र पुढे कमी वयातच आई होण्याची जबाबदारी आल्याने सातवी नंतर माझे शिक्षण थांबले. मला सुनील हा २६ जानेवारी १९९० मध्ये पहिला मुलगा झाला. त्यानंतर दुसरा मुलगा सचिन आणि त्यानंतर प्रीती नावाची मुलगी असे तीन अपत्य झाले. आमचा संसार जेमतेम परिस्थितीमध्ये आनंदात सुरू असतानाच पती गौतम वाघमारे हे नगरपालिकेमध्ये सफाई कामगार होते ते नेहमीप्रमाणे पहाटे सकाळीच सफाई कामासाठी जात असत. ड्युटीवर जात असताना ते हॉटेल वंदना समोर रस्ता ओलांडत असताना बस चालकाच्या निष्काळजीपणामुळे त्यांना बसणे उडवले आणि या अपघातात त्यांचा २०१५ मध्ये दुर्दैवी मृत्यू झाला. माझी मुले तशी लहानच होती आणि माझे वय देखील फार झालेले नव्हते. कमी वयात मला विधवेचे अवघड जगणे नशिबी आले.पतीच्या निधनानंतर मी जवळपास



दोन वर्ष घरातच बसून दु:ख सहन करत होते. मात्र माझ्यासमोर माझी तीन लहान चिमुकले दररोज दिसत होती. त्यांना जगवणे हा सर्वात मोठा प्रश्न माझ्यासमोर होता. त्यामुळे मी मनाने घट्ट होऊन नगरपालिकेमध्ये त्यांच्या जागेवर स्वच्छता कर्मचारी म्हणून टेम्परारी रुजू झाले. तब्बल बारा वर्ष बीड शहरातील रस्ते नाल्या सफाईचे काम अल्प मानधनात करून कसबसं घर चालवलं.मात्र त्यावर जबाबदारीचा गाडा हाकला जात नव्हता. शेवटी डोक्यावर टोपलं घेऊन गल्लोगल्ली भाजी विक्रीचा देखील व्यवसाय केला.कोणतेही काम करताना मी कधी लाज बाळगली नाही. स्वाभिमानाने आणि कष्टाने काम करत अर्धवट मोडलेला संसार पुन्हा एकदा उभारण्याचा प्रयत्न केला.

**तुमच्यावर कमी वयात दु:खाचे डोंगर कोसळलेले असताना तुम्ही सामाजिक कार्यात कसे काय सक्रिय सहभागी झालात..?**

मी विधवेचे जीवन जगत असताना माझ्यासारख्या समदुखी मला त्यादरम्यान चांगल्या सखी म्हणून मिळत गेल्या.चर्चेतून मग विधवांना शासकीय स्तरावर विविध योजना आहेत हे कानावर पडले. आणि मग त्या योजना आपल्याला मिळाव्यात आपल्याला हातभार लागावा म्हणून तहसील कार्यालयात पहिल्यांदा जाण्याचा योग आला. त्यावेळी तहसील कार्यालयात माझ्यासारख्या शेकडो महिला शासकीय योजनेच्या प्रतीक्षेत असलेल्या दिसून आल्या. त्यांचे हाल आणि दु:ख चर्चेतून अनुभवले आणि मी माझे दु:ख त्याच ठिकाणी विसरले. त्याचवेळी निर्णय घेतला की माझ्यासारख्या ज्या समदुखी विधवा, घटस्फोटीत, निराधार महिला आहेत त्यांना शासनाच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत.या सुविधा मिळवण्यासाठी ज्या काही तथाकथित दलालांच्या हातचे भावले व्हावे लागत होते. ते न होता मी थेट तहसीलदार साहेबांना भेटून माझ्यासोबत माझ्या सहकारी मैत्रिणींचे आणि ज्यांच्या ओळखी झाल्या होत्या त्यांची कामे करून घेतली. माझ्याकडून झटपट काम बिना मोबदल्यात झाल्यामुळे माझ्या नावाची चर्चा इतर महिलांमध्ये झाली. मग त्या महिला देखील माझ्याकडे संजय गांधी निराधार, श्रावण बाळ आदी योजनांच्या मंजुरीसाठी अर्ज कसा दाखल करायचा ते लाभ कसा मिळवायचा याची माहिती घेण्यासाठी येऊ लागले. त्यांना माहिती देऊन त्यांचे काम करत करत नकळत सामाजिक कार्याला सुरुवात झाली. नंतर माझ्या लक्षात आले की असंख्य महिला लज्जेपोटी भीतीपोटी शासनाच्या या योजनेपर्यंत पोहोचत नाहीत. म्हणून मी असा निर्णय घेतला की आपणच गाव वस्त्यापर्यंत जायचे त्यांना या शासनाच्या योजना सांगायच्या आणि त्यांना त्याचा लाभ मिळवून द्यायचा. या माध्यमातून मी मदत कार्य करत असताना शेकडो नव्हे हजारो विधवा परितक्त्या निराधार आदी महिलांना शासनाचे शासकीय मानधन तर सुरू तर केलेच. याशिवाय त्यांना घरकुले,विंधन विहिरी, स्वच्छतागृह अशा एक नव्हे अनेक योजनांचा लाभ मिळवून देण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे माझ्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. हे कार्य करत असतानाच मी अनेक निराधार मुलींचे दायित्व स्वीकारले.मोनिका नावाची मुलगी दत्तक घेऊन तिच्या शिक्षणापासून ते लग्न लावून देईपर्यंत पुढे तिच्या मुलांच्या बाळंतपणापर्यंत आई म्हणून मी तिचे सर्व सुखदु:ख स्वीकारले. हे करत असताना आज देश सेवेसाठी सैन्य दलामध्ये, आर्मीमध्ये, पोलीस भरतीमध्ये मुलांची भरती व्हावी यासाठी त्यांना जागृत करून त्यांना देश सेवेसाठी प्रवृत्त करून शेकडो नव्हे हजारो तरुणांना सैन्य दलात, आर्मीमध्ये पोलीस भरती मध्ये लावण्या साठी मोठी यशस्वी भूमिका पार पाडली याचे समाधान वाटते.




**तुम्ही सामाजिक कार्यकर्त्या मग राजकारणाकडे कश्या वळाल्या ?**

विधवा परितक्त्या निराधार महिलांच्या प्रति माझे सामाजिक कार्य सुरू असताना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिबिरांचे आयोजन ठरवले होते. यासाठी आम्ही तत्कालीन सभापती रेखाताई रवींद्र क्षीरसागर यांना निमंत्रित केले होते. माझ्यातील संघटन कौशल्य पाहून त्यानंतर रेखाताईंनी मला कुटुंबातील सदस्यच केले आणि त्या जाहीर राजकीय कार्यक्रमांना जात त्यावेळी मला सोबत घेत होत्या.त्यांच्यासोबत मी कायम राजकीय क्षेत्रात दिसू लागल्याने माझा नकळत राजकीय प्रवास सुरू झाला.त्यांनीच मला संदीप भैया क्षीरसागर यांच्याशी चर्चा करून राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीमध्ये शहर कार्याध्यक्ष म्हणून २०१९ मध्ये पहिल्यांदा संधी दिली. तेव्हापासून माझा खऱ्या अर्थाने राजकीय प्रवास सुरू झाला. त्याच दरम्यान संदीप भैया यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विधानसभेची उमेदवारी दिली आणि आम्ही सर्व महिलांनी अहोरात्र परिश्रम घेतले मी ज्या ज्या महिलांसाठी काम केले त्या महिलांनी त्यांच्या कुटुंबीयांनी माझ्या शब्दावर संदीप भैय्यांना मदत केली. मी पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचारक म्हणून ज्यांची जबाबदारी स्वीकारले ते मोठ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आमदार झाले आणि आमच्या राजकीय प्रवासाच्या प्रारंभालाच मोठा विजय मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फाटा फूट झाली. मला व्यक्तिगत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत राहण्यासाठी वेगवेगळ्या स्वरूपाची ऑफर्स देण्यात आली. मात्र मी स्वर्गीय रेखाताई क्षीरसागर यांना शब्द दिला होता, मी आपल्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे संदीप भैयांची साथ सोडणार नाही. त्यांना माझ्या परीने राजकीय पाठबळ देण्याचा प्रयत्न करेल त्या शब्दाला जागे राहून आणि शरदचंद्र पवार साहेबांचे विचार त्यांचे कार्य माझ्यासाठी कायम दिशादर्शक मार्गदर्शक असल्याने मी मोठ्या पवार साहेबांसोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राहण्याचा निर्धार केला. मी पद पैसा पाहिला नाही प्रामाणिकपणे २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत संदीप भैया क्षीरसागर यांचेच काम केले आणि त्यांना पुन्हा एकदा निवडून आणले.

**आपल्याला राजकारणात जास्त इंटरेस्ट आहे का समाजकारणात ?**

खरंतर मला राजकीय कार्यापेक्षा सामाजिक काम केलेले जास्त आवडते. प्रामुख्याने विधवा परितकत्या निराधार, वृद्धांच्या समस्या जाणून घेणे,त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणे, यामध्ये मला खऱ्या अर्थाने आनंद मिळतो. अनेक वृद्धांना मी वृद्धाश्रमात जाण्यापासून रोखले आहे. बीड जिल्ह्यात जिथे कुठे वृद्धाश्रम बेघर निवारा केंद्र आहेत त्यांना मी जाऊन भेटी देते.तेथील पिढी त्यांना पिढी त्यांना पिढी त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करते.माझ्या परीने जे शक्य आहे ते सहकार्य करण्याचा प्रयत्न करते.कोविडच्या काळात मी माझ्या जीवाची पर्वा न करता असंख्य कोविड ग्रस्त रुग्णांची सेवा केली. त्यांचे जीव वाचवले.गरोदर माता वृद्ध दिव्यांग यांना पोटभर जेवण मिळावे अत्याचार पीडित मुलींना न्याय मिळावा यासाठी माझा कायम संघर्ष असतो. या कामात मला जास्त समाधान मिळते.









**आपले पुढे राजकीय आणि सामाजिक काय स्वप्ने स्वप्न आहेत ?**

मी सन २०२३ मध्ये आमच्या गावातून राखीव मतदार संघात मध्ये ग्रामपंचायत निवडणूक लढवली. मात्र माझ्या विरोधात माझी सखी मोठी जाऊ विरोधात उभी राहिल्याने माझा अगदी निसटता पराभव झाला. मात्र पराभवाने मी खचले नाही. गावच्या विकासासाठी गावातील वेगवेगळ्या समस्यांसाठी मी कायम रस्त्यावर संघर्षासाठी तयार असते, येणाऱ्या नगरपालिका,जिल्हा परिषद पंचायत समिती स्थानिक स्वराज्य मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शरदचंद्र पवार साहेब, सुप्रियाताई सुळे, जयंत आबा पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. ढेकणमोह गणा मधून जर पंचायत समिती साठी गण राखीव झाला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संधी दिली तर आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ढेकनमोहा पंचायत समितीची निवडणूक लढवून विजयी होण्याचे माझे स्वप्न माझे आहे. त्यासाठी माझा प्रयत्न सुरू आहे माझ्या राजकीय प्रवासामध्ये माझ्या मुलांनी सुनांनी नातेवाईकांनी कधीही हस्तक्षेप केला नाही त्यामुळेच मला आज या यशापर्यंत पोहोचता आले. माझ्या या सामाजिक राजकीय वाटचालीमध्ये खासदार सुप्रियाताई सुळे, रोहिणी ताई खडसे माजी आमदार अँड उषाताई दराडे यांना मी आदर्श मानून त्यांचे कार्य जाणून घेत राजकीय प्रवास करत आहे करत राहील हे नक्की

**जागतिक महिला दिनानिमित्त तुम्ही आज काय संदेश द्याल ?**

माता रमाई, सावित्रीबाई फुले यांच्यामुळे आज महिला सर्व क्षेत्रांमध्ये दमदार पावले पुढे टाकत आहेत. महिलांनी देखील सर्वच क्षेत्रांमध्ये उंच गगन भरारी घेऊन यश मिळवण्यासाठी धाडस करावे. संघर्षानंतर सुखाचे क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात नक्कीच येतात. मात्र संघर्षामध्ये कुठेही हतबल होऊ नका.. माझा त्यांच्यासाठी हाच प्रामाणिक संदेश असेल..






जागतिक महिला दिन विशेषांक २०२५

दैनिक **समर्थ राजयोग**

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बीड(महाराष्ट्र) | दैनिक मराठी | वर्ष ५ वे । अंक-१८२ | शनिवार,दि.०८ मार्च २०२५ | ९८ २२ ६२ ८५ २१ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | । किंमत ३ रुपये | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year 5 Th Issue-182 | Date 8 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# जन्मत: मुलगी म्हणून संघर्षाने घेरले

## प्रसंगी आयुष्य संपवण्याचा ही प्रयत्न करणाऱ्या रुपाली जयंत देशपांडे आज नामांकित रिच इव्हेंट लेडी..!

**मुलगी झाली म्हणून वडिलांनी नाकारलं.. जन्म घेतल्यापासून बाप जिवंत असतानाही वडिलांचे प्रेम कधी मिळालं नाही.. प्रसंगी लोकांच्या घरी भांडे घासून स्वयंपाक करून शिक्षण घेतलं.. मोठ्या कष्टाने संसाराचा गाडा पुन्हा नेटाने सुरू केला. बीडमध्ये त्याकाळी गजबजलेल्या धोंडीपुरामध्ये पहिली महिला दुकानाच्या गल्ल्यावर बसून जनरल स्टोअर्स आणि आर्ट फिशल ज्वेलरी चालवणारी म्हणून जिच्याकडे लोक कुतूहलाने पाहत असत त्या म्हणजे सौ रूपाली जयंत देशपांडे होय. पुढे व्यवसायात आर्थिक अडचणी आल्या. सावकारांच्या व्याजाने घेरले.एकदा नव्हे अनेक वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र सुदैवाने त्यातून वाचवले गेले. स्मृती हरवली गेली. चार वर्ष विजनवासात गेले.. आयुष्याचा संघर्ष सुरूच होता. या संघर्षात काही हितचिंतक मदतीला आले आणि आयुष्याच्या उभारणीला नव्याने सुरुवात झाली. सर्वप्रथम पहिली महिला व्यवसायिक असलेले डेकोरेशनचे दुकान पुन्हा एकदा नव्याने थाटले.बीडची गरज लक्षात घेऊन पहिले इव्हेंट मॅनेजमेंट सुरू केले. यामधून भरारी घेण्यास सुरुवात झाली. अवघ्या एक वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यातील पहिल्या महिला प्रमुख असलेल्या थेट टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या व्यवसायात त्यांनी पदार्पण केले. रिच टूर्स अँड ट्रॅव्हल्स आणि रिच इव्हेंट मॅनेजमेंट असे ब्रीद घेऊन निघालेल्या सौ.रूपाली जयंत देशपांडे संघर्षात रडत बसणाऱ्या महिलांसाठी एक आयडॉल ठरल्या आहेत, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही... जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने त्यांना जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने या मुलाखती मधून त्यांच्याच शब्दात त्यांच्या आयुष्यातील उलगडलेला हा जीवनपट वाचकांच्या आणि संघर्ष करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींसाठी समर्पित...**



वैभव स्वामी । बीड
मो.९८२२६२८५२१

शेख आयेशा रफिक । बीड
मो.७०३०१४९३२२



**आपला थोडक्यात परिचय..?**

माझे नाव सौ रूपाली जयंत देशपांडे. माझा जन्म बीड येथे १ जुलै १९८३ रोजी झाला. वडील कोतवाल गल्लीतील राम मंदिराचे ट्रस्टी होते. मात्र दुर्दैवाने मी त्यांच्या पोटी पहिली मुलगी जन्माला आले म्हणून त्यांनी मला आणि माझ्या आईला देखील सोडून दिले. माझी आई सविता देव हिने प्रसंगी नवऱ्याला सोडले पण मला वाचवले आणि वाढवले. आजीने आईला सल्ला दिला मुलगी लहान आहे तू शिक्षण घे आणि नोकरी करून मुलीला वाढव. त्यानुसार आईने औरंगाबाद गाठले. वेग वेगळ्या कंपन्यात, खाजगी ठिकाणी काम करून शिक्षण घेतले आणि ती पुढे कोर्टामध्ये क्लार्क म्हणून जॉईन झाली. आणि संघर्षाचा पहिला टप्पा कुठेतरी थोडा हलका झाला. आई आता सेवानिवृत्त झाली आहे. आणि कधीही बाप म्हणून ज्यांचं प्रेम मिळालं नाही त्या वडिलांचं काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे.

**आपले शिक्षण किती आणि कशा परिस्थितीत झाले..?**

मी आजीजवळ लहानपणी शिकायला होते. माझे प्राथमिक शिक्षण संस्कार विद्यालयात आणि पुढे माध्यमिक शिक्षण सावरकर विद्यालयामध्ये झाले. ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यानंतर मी औरंगाबाद येथे एमजीएम महाविद्यालयात पत्रकारितेचे जनलिस्टचे शिक्षण पूर्ण केले. ज्या क्षेत्रामध्ये महिला काम करत नाहीत फक्त पुरुष मंडळीच काम करते.त्या ठिकाणीच काम करायचे आणि मुलगी सुद्धा मुलापेक्षा कमी नसते हे मला लहानपणापासून जो त्रास भोगायला मिळाला त्यातून मी शिक्षण सुद्धा तशाच पद्धतीने घेतले. पुढे पत्रकारिता करण्याची इच्छा असतानाही मी पूर्णवेळ पत्रकारिता परिस्थितीनुसार करू शकले नाही मात्र काही वर्ष अनुभव घेतला.

**पत्रकारितेचे शिक्षण झाल्यानंतर पुढे काय करायचे ठरवले...?**

एमजीएम येथे पत्रकारितेचे शिक्षण झाल्यानंतर मी पुन्हा बीडला आले आणि कॉम्प्युटरचे क्लासेस लावले. कॉम्प्युटर शिकून पुढे कुठेतरी व्यावसायिक जॉब करावा असा विचार



होता. किंवा व्यवसायात त्याचा फायदा होईल असेही वाटले होते. त्यावेळी देखील कॉम्प्युटरच्या क्लासेसला शिक्षणासाठी मुलींचे प्राधान्य नव्हते. कॉम्प्युटरच्या क्लासेस मध्ये माझी जयंत देशपांडे सोबत ओळख झाली आणि या ओळखीचे रूपांतर पुढे प्रेमात झाले. त्याच्यासोबत २९ मार्च २००३ मध्ये माझे रीती रिवाजाप्रमाणे लग्न झाले.

**लग्नानंतर तुमच्या सुखी संसाराची सुरुवात कशी होत गेली..?**

माझी जेमतेम परिस्थिती आणि जयंत च्या घरची परिस्थिती सुद्धा जेमतेमच होती. त्यामुळे काहीतरी व्यवसाय केल्याशिवाय संसाराचा गाडा पुढे चालणार नव्हता म्हणून आम्ही दोघांनी मिळून धोंडीपुरामध्ये जनरल स्टोअरचे दुकान सुरू केले. मात्र सुरुवातीला त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.त्याच दरम्यान मला लहानपणापासून वेगळेपण शोधण्याची सवय असल्याने मी आर्ट फेशियल ज्वेलरीचे दुकान थाटले. याला ग्राहकांनी उदंड प्रतिसाद दिला. दुकानाच्या गल्ल्यावर बसणारी त्यावेळची पहिली महिला कदाचित असावी. त्यामुळे मला रोड रोमिओंचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. असंख्य वेदना आणि टॉर्चर केलं गेलं पण मी हिम्मत सोडली नाही. मला जयंतची भक्कम साथ होती. पुढे दुकान हळूहळू नावा रूपाला आले. आर्थिक अडचणी हळूहळू संपुष्टात आल्या आणि दोन रुपये बेरजेचे होवू लागले. बघता बघता लग्नाला चार वर्ष होऊन गेली होती. मात्र मूल होत नव्हते. त्यामुळे डॉक्टरांकडे तपासण्यासाठी गेलो आणि चार दिवसही सुखाचे गेले नव्हते की लागलीच पुन्हा एकदा दुःखाने फेरा मारला. डॉक्टरांनी मला कॅन्सर असल्याचे थेट निदान केले. त्यानंतर दुकानाकडे लक्ष कमी आणि दवाखान्याच्या चक्रा वाढल्या. दवाखान्याला मोठ्या प्रमाणात पैसे खर्च होत गेले. एकीकडे दुकानाचा दररोजचा ३० ते ३५ हजार रुपयांचा गल्ला त्या काळात होत होता त्याला ब्रेक बसला आणि दररोज पाच ते दहा हजार रुपयांचा दवाखान्याचा खर्च सुरू झाला. त्यामुळे लहानपणापासून ज्या यातना दुःख सहन करत आले होते. लग्नानंतर त्यात बदल होईल असे मनस्वी वाटले होते. मात्र चार दिवसही सुखाचे गेले नाहीत तोच पुन्हा एकदा आजारपणाचे वेगळे दुःख सोबत घेऊन माझ्या सुखी संसाराची सुरुवात पुन्हा दुःखाने सुरू झाली.

**या दरम्यान तुम्ही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असे समजते ते खरे आहे का..?**

हो अगदी खरे आहे. माझ्या दवाखान्यासाठी पती जयंत देशपांडे यांनी मला न विचारता काही सावकारांकडून व्याजाने पैसे घेतले. एक तर दुकान बंद होते आणि दुसरीकडे माझ्या दवाखान्याचा खर्च सुरू झालेला होता. त्यातच भर पडली ती सावकारांच्या व्याजांची. एका सावकाराचे व्याज भरण्यासाठी दुसऱ्या सावकाराकडून पैसे काढायचे असे प्रकार वाढले आणि मग जयंत आणि मी आम्ही दोघेही खूप डिप्रेशन मध्ये गेलो. सगळं आयुष्य उध्वस्त झालं, जगणं अवघड झालं, असं समोर दिसू लागलं. या नैराश्यातून मी झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र ४८ तासानंतर मी शुद्धीवर आले आणि वाचले.मी पुन्हा एकदा काही दिवसांनी त्यापेक्षा जास्त गोळ्या खाल्ल्या आणि आत्महत्याचा प्रयत्न केला मात्र माझ्या आयुष्याची दोर इथही तुटली नाही. मी त्यातूनही वाचले.मात्र पुढे मला ब्रेनचा झटका आला आणि माझी स्मृती हरवली. सन २०१० मध्ये मला त्यावेळी पंधरा ते वीस शॉक देण्यात आले. त्या ट्रीटमेंट मुळे मी स्वतःलाही विसरले आणि इतरांना ओळखायला सुद्धा विसरले. अक्षरे विसरली मी पुन्हा एकदा शून्यात गेले. काही महिन्यानंतर मी आईला ओळखले त्यानंतर पुढे नवरा जयंतला ओळखले. हळूहळू माझी लहान बाळासारखी अवस्था झाली. मी पुन्हा एकदा अ आ इ ही मुळाक्षरे त्यानंतर आकडे ओळख सुरू केली. माझी ही अवस्था पाहून मी रात्र रात्र रडत बसायची. त्यानंतर मी प्रजापिता ब्रह्मकुमारी यांचे व्याख्यान ऐकले आणि देवाला नाव ठेवायचं विसरून गेले. जे घडलं ते कदाचित आपल्या चुकीने याची जाणीव स्वतःच्याच मनाला करून घेतली. याच काळात मला माझ्या आईने आणि आजीने मला मजबूत करण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान मला शिवसेनेचे जयसिंग मामा चुंगडे देवाच्या रूपाने मदतीला आले आणि त्यांनीच मला खऱ्या अर्थाने नवीन जीवन दिल. त्यानंतर मी नव्या उमेदीने पुन्हा एकदा जगायचं ठरवलं.

**मग नव्याने पुन्हा एकदा उद्योग व्यवसायात भरारी कशी घेतली..?**

शिवसेनेचे नेते जयसिंग मामा चुंगडे यांनी मला त्यांच्या घरातील सदस्य केले. अगदी मुलीप्रमाणे भावा प्रमाणे माझ्या पाठीशी मानसिक आर्थिक आणि शारीरिक पाठबळाने उभे राहिले. मला नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले. त्यांच्या सुविध पत्नी सुनीता भाभी यांनी देखील



मला खूप साथ दिली. एवढेच नव्हे तर त्यांच्या तीनही मुलांनी मला दिलेल्या पाठबळामुळे त्यांच्या मदतीतून मी डेकोरेशनचा व्यवसाय सुरू केला. आमच्या कुटुंब्याच्या पाठीमागे जो खाजगी सावकारांचा सिसे मीरा लागला होता तो चुंगडे मामा आणि शिवसेनेचे नेते अनिल दादा जगताप यांच्यामुळे दूर झाला. आणि आम्ही मोकळा श्वास घेत नव्याने उद्योग व्यवसाय उभारण्यास सुरुवात केली. पुढे बीडची गरज लक्षात घेऊन मी इव्हेंट मॅनेजमेंट हा व्यवसाय स्वीकारला. या व्यवसायातील कदाचित मी बीड मधील पहिली महिला असेल. या व्यवसायात मला लोकप्रश्नचे संपादक दिलीप खिस्ती सर यांनी अनमोल साथ दिली.जी आज तागायत कायम आहे.पुढे मी लग्नाचे इव्हेंट घेण्यास सुरुवात केली. या कामामध्ये मला सासू आणि सासरे यांची सुद्धा मिळालेली मदत आणि साथ पुढे प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरली. श्री गणेशा इव्हेंट्स या नावाने एमआयडीसी परिसरात सुरू केलेल्या या व्यवसायातून हळूहळू प्रगती होत गेली.

**तुम्ही इव्हेंट मॅनेजमेंट मध्ये असताना अचानक टूर्स अँड ट्रॅव्हल्स या व्यवसायाकडे कसे वळालात..?**

ज्या क्षेत्रामध्ये मुली नाहीत फक्त पुरुषच काम करतात त्या ठिकाणी आव्हानात्मक काम स्वीकारण्याची सवय लहानपणापासून असल्यामुळे मी वरील वेगवेगळे व्यवसाय स्वीकारले होते. साधारण दोन वर्षांपूर्वी माझ्या आईला देव देव करायला जायचे होते. पण तिच्यासोबत वेळ देऊन जाणारे कोणी सोबती नव्हते. त्यावेळी माझ्या डोक्यात कल्पना आली. जी अडचण माझ्या आईला आली अशा अडचणी इतर महिलांना सुद्धा येत असतील. त्यामुळे मी फक्त महिलांसाठी टूर्स अँड ट्रॅव्हल्स हा नवा व्यवसाय सुरू करायचा निर्णय घेतला. या व्यवसायात पदार्पण केले. पहिलाच कोकण दर्शनाचा चार दिवसाचा टूर्स काढला आणि या सहलीला तब्बल २६ महिलांनी प्रतिसाद दिला. यामध्ये मी माझ्या आईला सोबत घेतले आणि आमचा पहिला टूर्स सक्सेस झाला. त्याच वेळी आलेल्या सर्व महिलांनी सगळे बंधने बाजूला ठेवून मुक्त श्वास घेत आनंदी जीवन जगण्याचा खरा आनंद त्या चार दिवसात संस्काराच्या चौकटी अबाधित ठेवून घेतला. त्याचवेळी या सर्व महिलांनी आता दरवर्षी आपण ट्रीप काढायची हा निर्धार केला त्यानंतर पुढे अष्टविनायक, गोवा असे टूर्स आमचे सुरू झाले. मी प्रत्येक टूर्स मध्ये आईला सोबत घेते आणि गोव्याला सुद्धा फक्त महिला जाऊ शकतात हे दाखवून दिलं.तुम्ही जेवढ फिराल तेवढे जग कळेल. आपण स्वतःसाठी सुद्धा जगल पाहिजे हे महिलांच्या लक्षात आणून दिलं आणि त्यांना मनसोक्त आनंद जीवन जगण्याचा एक नवा प्लॅटफॉर्म तयार करून दिला. महिला आनंदी होत असताना पाहून मला देखील आता स्वर्गीय आनंद मिळत आहे.

**तुमचा आता नवा प्लॅन भविष्यासाठी काय आहे...?**

मला बीडमध्ये रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन सारखं संकुल बीडमध्ये उभारण्याचा मानस आहे. मी बीडमध्ये शिक्षण घेत असताना शिक्षणाचा जो अभाव मला दिसला तो पुढच्या पिढीला राहू नये म्हणून बीडमध्ये गुरुकुल पद्धतीचे शिक्षण सुरू करावे असे विचारात आहे. सद्यस्थितीत खूप कमी व यांच्या मुलांना पालक शाळेमध्ये दाखल करत आहे. त्यामुळे शाळेत गर्दी होत असल्याने त्या मुलांना कशात आवड आहे. तो पुढे काय करू शकतो ? याचा विकास होत नाही पालकांना जे अपेक्षित आहे तेच विद्यार्थ्यांकडून करून घेण्याचा प्रयत्न होत आहे. जो चुकीचा आहे. पाचवीपर्यंतच्या मुलांमध्ये नेमकी बुद्धी क्षमता किती आहे ? त्यांची कल्पकता काय आहे ? हे तपासले जाऊ शकते त्यामुळे मला जे गुरुकुल उभा करायचे आहे त्यामध्ये या विद्यार्थ्यांचे भविष्य शोधणारी तंत्रशुद्ध शिकलेली टीम उभे करणार आहे या गुरुकुला मधून केवळ डॉक्टर इंजिनियर शिक्षक एमबीए चार्टर्ड अकाउंट तयार करणारे फॅक्टरीचा रोल नसावा. तर चांगले दर्जेदार गुणात्मक,भ्रष्टाचार न करणारी संस्कारक्षम पिढी घडवणारे संकुल लवकरच उभा करण्याचा माझा मानस आहे.

**आपण सुरुवातीला असे म्हणाला होतात मूल होत नव्हते म्हणून दवाखाना पाठीमागे लागला मग पुढे संसार वेलीवर मुलाचे सुख आयुष्यात आले का..?**

डॉक्टरांनी मला गर्भाशयाला गाठ असल्यामुळे मूल होणार नाही असे स्पष्टपणे सांगितलेले होते. त्यामुळे मी आई होऊ शकणार नाही आणि जयंत बाप होऊ शकणार नाही हे दुःख आमच्या दोघांच्याही मनामध्ये सातत्याने वेदना देत होतं.त्यामुळे आम्ही दत्तक मूल घेण्याचा निर्णय घेतला. दत्तक घेताना मी मुलगी म्हणून जन्माला आल्यामुळे किती त्रास सहन केला तो प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे अशाच एका अनाथ मुलीचे आपण आई व्हायचे असे ठरवले आणि ते जयंत ने मान्य केले. अहमदनगरच्या स्नेहालयातून आम्ही अधिकृत रजिस्ट्रेशन केलं आणि मुंबईतून आम्हाला नंबर लागला. सात महिन्याच कन्यारत्न आम्ही दत्तक कन्या म्हणून स्वीकारलं. आज माझी दत्तक कन्या दीड वर्षाची झाली आहे. ती जेव्हा पूर्णपणे समजदार होईल तेव्हा तिला आम्ही सर्व वस्तुस्थिती सांगू तिच्यापासून काहीही लपवणार नाहीत.

**एवढ सगळ दुःख यातना संघर्ष आयुष्याच्या उंबरठ्यावर सातत्याने असतानाही तुम्ही सामाजिक कार्याताई सक्रिय कसे होतात..?**

प्रत्येकाच्या आयुष्यात दुःख, यातना, संघर्ष नक्कीच आहे. माझ्या नशिबात तो जरा जास्त होता इतकंच. पण त्यामुळे मी माझे सामाजिक दायित्व कधी थांबवले नाही. मी लोळतगाव हे गाव हागणदारी मुक्त केलं. ज्या महिला गाव कुसाच्या बाहेर उघड्यावर जात होत्या त्यांना हक्काचं शौचालय उभा करून दिलं. रोटरीच्या कार्यक्रमांमध्ये सातत्याने आम्ही सामाजिक कार्यामध्ये सहभागी असतो. बीडच्या बस स्थानकावर,रस्त्यावर ज्यांना रक्ताची बहीण नाही असूनही येत नाही अशा निराधार बंधूंना आम्ही राखी पौर्णिमेला राखी बांधण्याचा संकल्प सुरू केला. एचआयव्ही बाधित झालेल्या महिलांना, पुरुषांना, मुलांना आम्ही कॉन्सलिंग द्वारे त्यांचं मतपरिवर्तन सुरू केलं. अल्लड वयात ज्या मुलींचे लग्न होतात त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात त्यांच्यावरही कौन्सलिंग सुरू केलं. ज्या मुली महिला आत्महत्येच्या वाटेवर असतात



त्यांचही कॉन्सनिंग करून आम्ही त्यांना जगण्याची नवी उमेद देत आहोत. या कामांमध्ये मला डॉक्टर सुप्रिया वाघ यांचे अनमोल सहकार्य लाभत आहे याचा आनंद वाटतो.

**तुमच्या या खडतर आयुष्याला नव्याने उभारणी देण्यासाठी देवदूत म्हणून नेमकं कोण कोण उभारल गेलं..?**

जन्मापासून माझी आई सविता देव यासह माझी आज्जी शशिकलाबाई देव, मामा वासुदेव देव, संजय देव, प्रमोद देव त्याचबरोबर पुढे पती जयंत देशपांडे, माझे सासू-सासरे बाळासाहेब देशपांडे आणि सासू आनंदी देशपांडे, त्याचबरोबर शिवसेनेचे नेते माझे बंधू जयसिंग मामा चुंगडे, संपादक दिलीप खिस्ती तसेच डॉक्टर प्रदीप कुमार उजगरे, हरीशभाई मोटवानी, गंगाभीषण करवा यासह प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष माझ्या आयुष्याला उभारणी देण्यासाठी असंख्य जनांची मदत मिळाली. मी या सर्वांमुळेच पुन्हा एकदा नव्याने फिनिक्स भरारी घेऊ शकले हे नक्की.

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तुम्ही महिलांना काय संदेश द्याल..?**

महिलांनी फक्त जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एक दिवस आपला आनंद साजरा करणे माझ्या मनाला पटत नाही. महिलांनी दररोज आनंदाने जगले पाहिजे. हवं तेव्हा शॉपिंग केली पाहिजे, वाटेल तेव्हा फिरलं पाहिजे खाल्ले पाहिजे. वाटेल तेव्हा केक कापून आपण आनंद साजरा केला पाहिजे. महिलांनी पुरुषांना नंदीबैल करू नये. त्यालाही स्वातंत्र्य द्यावं आणि आपलं स्वतःचाही स्वातंत्र्य जपावं. आपल्या नवऱ्याला ही थोडासा जगण्याचा स्पेस द्या,दोघात विश्वास ठेवून जगण्याचा आनंद घ्या.जर असं केलं तर हे जग फार सुंदर आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक पिल्लरला जपा आणि श्वासात श्वास आहे, डोळे उघडे आहेत तोपर्यंत आनंदी जीवन जगण्याचा आनंद घ्या. हाच माझा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसह पुरुषांना देखील सल्ला आहे.









जागतिक महिला दिन विशेषांक २०२५

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बीड(महाराष्ट्र) | दैनिक मराठी | वर्ष ५ वे । अंक-१८२ | शनिवार,दि.०८ मार्च २०२५ | ९८ २२ ६२ ८५ २१ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | । किंमत ३ रुपये | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year 5 Th Issue-182 | Date 8 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# आमदार कन्या ते आमदार सून अशी ऐश्वर्य संपन्नता असतानाही सामान्य जनतेच्या जनसेवेसाठी चंपावती काकी पानसंबळ अविरत..!







**पाटोदा येथील माजी आमदार लक्ष्मण तात्या जाधव यांच्या कुटुंबातील कन्या आणि माजी आमदार निंबाजीराव पानसंबळ लिंबाजीराव पानसंबळ यांच्या सुनबाई चंपावती काकी कृष्णा पान संबळ यांचा जन्म आणि संसार घर राजकीय दृष्ट्या ऐश्वर्या संपन्न असतानाही चंपावती काकीने कधीही राजकीय रुबाब दाखवला नाही त्यात कायम सामान्य जनतेच्या जनसेवेसाठी उपेक्षित वंचित यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष कन्या म्हणून अविरतपणे सेवेत कार्यरत आहेत त्यांचे पती प्रशासकीय सेवेत अधिकारी असताना देखील आमदार असलेल्या वडिलांचा आदर्श घेऊन ते देखील गरजवंतांच्या मदतीसाठी काकीन सोबत कायम पुढाकार घेतात त्यामुळेच शिरूर तालुक्यात आणि आष्टी मतदार संघात काकींच्या नावाची चर्चा कायम असते ग्रामपंचायत पासून जिल्हा परिषद पर्यंत ते विधानसभा निवडणुकी पर्यंत काकींना राजकीय संधी ने कायम हुलकावणी दिली त्या आता मरणासन्न आजारावर मात करून पुन्हा एकदा जनसेवेसाठी बाहेर पडल्या आहेत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्यांच्या कपाळी नक्कीच गुलाल लागेल आणि त्यांचे सामाजिक कार्यातील पुण्याईला आगामी काळात बहर येईल यात शंका नाही...**

वैभव स्वामी । बीड
मो.९८२२६२८५२१

शेख आयेशा रफिक । बीड
मो.७०३०१४९३२२


माझे सासरे
डॉ.लिंबाजीराव पानसंबळ


माझे काका (चुलते)
श्री.लक्ष्मण तात्या जाधव

**आपला थोडक्यात परिचय..?**

मी चंपावती कृष्णा पानसंबळ. माहेरचे नाव चंपाराणी महादेवराव जाधव. माझे माहेर पाटोदा जन्म २५ ऑगस्ट १९७६ मध्ये राजकीय घराण्यात झाला. आष्टी पाटोदा मतदार संघाचे १९७८ साली आमदार झालेले लक्ष्मण तात्या जाधव हे माझे मोठे काका होत. वडिलांसह तीन काका आणि तीन आत्या अशा मोठ्या परिवारात माझा जन्म झाला. राजकीय पार्श्वभूमी असतानाही माझे वडील महादेवराव जाधव एकनिष्ठ शेतकरी शेतात कष्ट करणारे होते. मला एक भाऊ आणि एक बहीण आहे मात्र आमची एकत्रित फॅमिली असल्याने आम्ही बारा बहिणी आणि सात भाऊ असा परिवार आहे. माझे आजोळ सोनेगाव तालुका पाटोदा असून भिकुराव चौरे तात्या माझे आजोबा. त्यांची देखील मोठी फॅमिली आहे.माझ्या आईला नानी म्हणत असत. नानीच्या पोटी राणी झाली म्हणून माझे नाव बीडच्या चंपावती राणी वरून चंपाराणी ठेवण्यात आले. असे माझ्या नावात

**काय सांगता येईल..?**

माझे पती कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांचे वडील डॉक्टर लिंबाजीराव पानसंबळ हे माजलगाव मतदार संघातून १९५२ मध्ये एकदा आणि त्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघातून १९५७ साली असे एकदा नव्हे दोन वेळा आमदार झालेले होते. माझे पती त्यावेळी लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले ते मूळ शिरूर कासार तालुक्यातील उकिरडा चकला या गावचे. परंतु वैद्यकीय व्यवसाय निमित्त ते शिरूर येथे वास्तव्याला होते. वैद्यकीय सेवेतून त्यांचा जनसंपर्क दांडगा झाला.माझे मोठे दिर स्वर्गीय डॉक्टर रमेशराव पानसंबळ

आणि सासर देखील राजकीय कुटुंबांची पार्श्वभूमी असलेले मिळाले. मात्र मला प्रशासकीय सेवेतून जनसेवा करण्याचे स्वप्न होते. यासाठी स्पर्धात्मक परीक्षेतून प्रयत्न केला मात्र अपेक्षित यश मिळाले नाही. लहानपणापासूनच माझा जनसेवकडे आणि सामाजिक सेवेकडे जास्त ओढा होता. त्यामुळे लग्नानंतर सुद्धा मी सामाजिक कार्य सुरू केले. माझे सामाजिक कार्य पाहून मला उकिरडा चकला ग्रामस्थांनी आग्रह करून २०१२ मध्ये गावच्या ग्रामपंचायत निवडणुकीतून उभे केले ती माझी आयुष्यातील पहिली सार्वत्रिक निवडणूक होती. या निवडणुकीत माझा अवघ्या चार मतांनी पराभव झाला. मात्र मी पराभवामुळे खचले नाही उलट जास्त जोमाने आणखीन काम सुरू केले. दरम्यान २०१७ मध्ये मातोरी गटातून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्यासाठी मतदारांच्या आग्रहास्तव आम्ही पुढाकार घेतला. मात्र त्यावेळी स्थानिक राजकारणातून आमच्या उमेदवारीला

राजकीय वातावरण आज राहिलेले नाही. मात्र पूर्वीसारखं राजकारण पुन्हा एकदा सक्षमपणे



उभारण्याचा प्रयत्न आता भविष्यात करणार आहे. येणारी जिल्हा परिषद निवडणूक जर आमदार सुरेश आण्णा धस यांनी पक्षाकडून संधी दिली तर लढवण्याची प्रबळ इच्छा आहे. आज पर्यंत गुलालाने थोडक्यात हुलकावणी








रहस्य दडलेले आहे. पाटोदा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत माझे प्राथमिक माध्यमिक शिक्षण झाले.दहावीत असतानाच लग्न झाले. पुढे मी लग्नानंतरही शिक्षणाची आवड असल्याने बारावी आणि बी ए मध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण करून एलएलबी देखील पूर्ण केले. दरम्यान मी स्पर्धात्मक परीक्षेची तयारी देखील केली. परंतु नशिबाने थोडक्यात हुलकावणी दिली. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न माझे अधूरे राहिले.

**विवाहाचा योग कसा जुळून आला..?**

माझ्या मोठ्या काकांचा जनसंपर्क दांडगा होता. शिरूर येथील डॉक्टर असलेले माजी आमदार लिंबाजीराव पानसंबळ यांचा मुलगा कृष्णा हा इंजिनीयर झालेला असून त्यांच्याकडून स्थळासंदर्भात विचारणा झाली आहे असा निरोप वडिलांना देण्यात आला. आणि माझा अरेंज पद्धतीने धार्मिक विधीनुसार विवाह कृष्णा लिंबाजीराव पानसंबळ यांच्यासमवेत १९९३ मध्ये झाला. माझे सासरे डॉक्टर लिंबाजीराव पानसंबळ यांचा माजलगाव मतदार संघामध्ये त्या काळात वैद्यकीय व्यवसाय होता. त्यांनी वैद्यकीय क्षेत्राला व्यवसाय न करता सेवेचे रूप दिल्यामुळे त्यांचे नाव जनसामान्यांच्या गळ्यातील ताईत झाले होते. म्हणूनच त्यांना पब्लिक डेमोक्रॅटिक फ्रंट सुभाष चंद्र बोस यांच्या असेंबली पक्षाकडून १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेला संधी दिली. आणि ते पहिल्याच निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आले. पानसंबळ कुटुंबियांचा देखील मोठा परिवार आहे. आमदार साहेबांना चार भाऊ आणि पाच बहिणी असा मोठा परिवार होता. पानसंबळ कुटुंबियांना आमदारकीची राजकीय पार्श्वभूमी असल्यामुळेच कदाचित आमचा विवाह योग जुळून आला हे नक्की.

**आपल्या सासरच्या मंडळी संदर्भात**

हे घरात सर्वात मोठे असल्याने त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर राजकीय जबाबदारी सर्वस्वी त्यांच्या खांद्यावर आली. ते तीन वेळा



जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले होते.त्यामुळेच शिरूर मतदारसंघात पानसंबळ कुटुंबियांना मानणारा मोठा वर्ग आजही कायम आहे. माझे दुसरे दिर सुभाषराव पानसंबळ यांच्या पत्नी कुसुमताई पानसंबळ यादेखील पाटोदा पंचायत समितीमध्ये १९९४ साली सदस्य होत्या त्याच दरम्यान लग्नानंतर माझे नाव देखील राजकीय दृष्ट्या चर्चेत आलेलं होतं.

**मग आपला राजकीय प्रवास प्रत्यक्ष कधी सुरू झाला..?**

माझा राजकीय कुटुंबात जन्म झाला

विरोध करून दावलण्यात आले तरीदेखील आम्ही न करता अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आणि निवडणूक लढवली. केवळ ५७ मतांनी माझा निसटता पराभव झाला. या निवडणुकीनंतर मी मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आणि त्यावेळी मला राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष पद देण्यात आले. या पदानंतर मी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात माझा जनसंपर्क वाढवला आणि नेटाने काम सुरू केले. माझ्या कामाची चर्चा जोमाने सुरू झाली. आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवार असेल अशी अशा चर्चांना मोठे उदान आले. मात्र याचवेळी राजकीय ट्विस्ट पुन्हा एकदा झाले. आणि मला मिळणाऱ्या संधीने पुन्हा एकदा हुलकावणी देत बाळासाहेब आजबे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. नाराज न होता पक्षाने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला आणि त्यात यशही मिळवले. दरम्यान मतदारसंघातील राजकीय गणिते बदलली. बदललेल्या राजकीय गणितानुसार आम्ही त्यावेळी भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आणि आज आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली भाजपामध्ये सक्रिय आहोत.

**सध्या राजकीय वातावरण खूप वेगळ्या वळणावर आलेले आहे अशा परिस्थितीत आपली पुढील राजकीय भूमिका काय असेल..?**

अगदी खर आहे पूर्वीसारखं पोषक हेल्दी

दिलेली आहे. यावेळी मात्र गुलालाची उधळण होईल आम्ही आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याच्या पुण्याई ला कुठेतरी



समाज न्याय देईल अशी खात्री आहे. मातोरी पाडळी या जिल्हा परिषदेच्या गटात स्वखर्चाने मोठ्या प्रमाणात विकासाची कामे मार्गी लावले आहेत.त्याचबरोबर शासकीय योजनेच्या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केलेली आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये आम्ही सहभागी झालेलो आहोत. सण असेल उत्सव असेल सार्वजनिक कार्यक्रम असतील लग्ना साठी आर्थिक अडचण असेल शिक्षणासाठी मदतीची गरज असेल सप्ताह असतील सर्व जाती धर्मातील जयंती पुण्यतिथी सप्ताह महोत्सव असेल यासाठी आमच्या घराची दरवाजे मदतीसाठी कायम उघडी राहिलेली आहे सामाजिक दायित्व स्वीकारून आमच्या

साहेबांनी शिरूर मतदार संघात वर तिसऱ्या मुलाप्रमाणे प्रेम केले आहे त्यामुळेच या भागात आमच्या परिवाराला मोठा मान आहे. याचा आम्हाला अभिमान आहे

**आपण एका मोठ्या आजारावर मात केली आहे, काय होता नेमका आपणास आजार...?**

तुमचे म्हणणे अगदी खरे आहे. मला जीबीएस सारख्या आजाराने घेरले होते. तब्बल तीन महिने मला बेड वरून उठता सुद्धा येत नव्हते. परिस्थिती अतिशय बिकट आणि नाजूक झालेली होती. मात्र इच्छाशक्तीने या दुर्धम्य आजारावर मात करत अवघ्या तीन महिन्यांमध्ये मी पुन्हा एकदा हळूहळू उभारी घेत आहे. मी पुन्हा एकदा नव्या जोमाने नव्या दमाने राजकीय आणि सामाजिक कार्यामध्ये सक्रिय होणार आहेत.

**तुमच्या कुटुंबाविषयी काय सांगाल...?**

माझे पती कृष्णा लिंबाजीराव पानसंबळ हे सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये १९९५ शाखा अभियंता म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले. त्यांनी आपल्या कर्तुत्वावर पुढे प्रगती करत असते. बीड सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन चे प्रभारी कार्यकारी अभियंता आणि आष्टी येथे उपविभागीय अभियंता म्हणून पदोन्नतीने कार्यरत आहे. त्यांनी मला लग्नापासून ते आज पर्यंत कधीही सामाजिक आणि राजकीय कार्यापासून रोखले नाही.उलट माझ्या सामाजिक आणि राजकीय प्रवासात ते माझ्यासाठी माईल स्टोन राहिले आहेत.मला दोन जुळी मुले आहेत. त्यातील मोठा रोहन हा एमबीबीएस डॉक्टर झाला असून पुढे पीजीची डॉक्टरेट मुंबई येथे येथील एमजीएम येथे करत आहे. तर दुसरा रोहित हा सिविल इंजिनियर झाला असून सामाजिक कार्यामध्ये त्याने आता स्वतःला झोपून दिल्यामुळे माझ्या कार्यात मला मोठा आधार मिळाला आहे. माझे बंधू प्राध्यापक

डॉक्टर सुनील महादेवराव जाधव हे पाटोदा येथील जय भवानी कॉलेजला प्राचार्य होते तर बहीण सविता इंद्रकुमार झांजे ही कडा



येथे जिल्हा परिषद सहशिक्षिका आहे तर माझे चुलत बंधू संतोष दादा जाधव लक्ष्मणराव तात्यांचे चिरंजीव यांच्या पत्नी या पाटोदा नगरपंचायतच्या नगरसेविका आहेत.

**जागतिक महिला दिनानिमित्त आपण काय संदेश द्याल...?**

महिलांनी क्षेत्र कोणतेही असो कठीण परिश्रम आणि सातत्य ठेवत कष्ट केल्यास यश हमखास मिळेल. वेळेच्या आधी अनेक वेळेच्या नंतर काही मिळत नाही. योग्य वेळी तुम्हाला संधी नक्की मिळेल ती वेळ योग्यतेची येण्यापर्यंत वाट पहा. संघर्ष करा मात्र निराश होऊ नका.. कधीही खचून जाऊ नका... एवढाच माझा यानिमित्ताने संदेश असेल. माझ्या सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..







